❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | बुधवार, दि. ०२ सप्टेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २४८ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रुपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

# सुट्टे खाद्यतेल व्यावसायिकांना कायद्यानुरूप बदलांसाठी एक वर्षाची मुदत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : एफडीए आणि व्यापाऱ्यांची संयुक्त समिती स्थापन करणार

- ग्रामीण भागातील नागरिक व व्यावसायिकांच्या गरजांचा विचार करून निर्णय
- व्यवसाय संक्रमण अनुकूल करण्यासाठी शासन मदत करणार



■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील सुट्या खाद्यतेल विक्रेत्यांना विद्यमान कायद्यानुसार व्यवसाय पद्धतीत आवश्यक बदल करण्यासाठी एक वर्षाचा संक्रमण कालावधी देण्यात येणार आहे. या बदलांसाठी उपाययोजना व मार्गदर्शन सुचविण्यासाठी अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आणि व्यापारी प्रतिनिधींची संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार या बदलांना सामोरे जाताना व्यावसायिकांना राज्य शासनाकडून मदत, सुविधा तसेच अनुदान अथवा सबसिडी उपलब्ध करून देण्यात येईल, असा दिलासा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुट्या खाद्यतेल विक्रेत्यांना दिला.

मंत्रालयात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सुट्टे खाद्यतेल व्यावसायिकांची बैठक झाली. बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अन्न व औषध प्रशासन तथा विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, अन्न व औषध प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे, अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे, महाराष्ट्र तौलिक महासंघाचे अध्यक्ष माजी खासदार रामदास तडस, माजी आमदार शिरीष चौधरी, खाद्यतेल उत्पादक व विक्रेता संघटनांचे कार्याध्यक्ष गजानन शेलार, महासचिव डॉ. भूषण कर्डिले, महाराष्ट्र प्रांतिक महासभेचे पोपटराव गवळी, शंकर ठक्कर, भारत कसळेकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सुट्या खाद्यतेल विक्रीवरील कारवाईची अंमलबजावणी तूर्तास एक वर्षासाठी स्थगित ठेवण्यात येईल. मात्र, त्यानंतर मुदतवाढ देता येणार नाही आणि कायद्याचे पालन करावेच लागेल. त्यामुळे या एक वर्षाच्या कालावधीत प्रत्येक व्यावसायिकांना आपल्या व्यवसाय पद्धतीत कायद्यानुरूप आवश्यक बदल करावे लागतील, या कालावधीत कायद्याचे पालन करण्यासाठी पारंपरिक व्यावसायिकांना कोणते बदल करावे लागतील, याबाबत समिती उपाय सुचवेल. ग्रामीण भागातही सुट्या खाद्यतेलाची मागणी आणि गरज आहे. त्याचबरोबर या व्यवसायावर अनेक व्यावसायिकांचा रोजगार अवलंबून आहे. त्यामुळे कायदा आणि सामान्य माणसाची गरज यामध्ये योग्य मार्ग काढणे आवश्यक आहे. सुट्या खाद्यतेलाचा वापर आणि विक्रीची पद्धत राज्यात अनेक वर्षांपासून पारंपरिक स्वरूपात सुरू आहे. त्यामुळे ही पद्धत बदलण्यासाठी व्यावसायिकांना काही कालावधी देणे आवश्यक आहे. कायदा आपले काम करतो; मात्र पारंपरिक व्यवसाय पद्धतीतून कायद्यानुरूप व्यवस्थेकडे जाण्यासाठी संक्रमण कालावधी आवश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या व्यवसायातील व्यावसायिक, खाद्यतेल विक्रेते, उत्पादक आणि पुन्हा पॅकिंग करणारे उद्योजक यांच्यासाठी कायद्यानुरूप बदल करण्याचे नियोजन समितीच्या माध्यमातून करण्यात येईल. गुणवत्ता तपासणी व्यवस्था, पॅकेजिंग सुविधा आणि इतर आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी व्यावसायिकांना मदत करण्याचा शासनाचा प्रयत्न राहील, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### समित्यांच्या माध्यमातून उपाययोजना

सुट्या खाद्यतेल व्यवसायाशी संबंधित प्रश्नांवर उपाय सुचविण्यासाठी दोन समित्या स्थापन करण्यात येणार आहेत. यापैकी एका समितीमार्फत पारंपरिक पद्धतीने व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांच्या अडचणींचा अभ्यास करून त्यांना कायद्यानुरूप बदल करण्यासाठी आवश्यक उपाय सुचविले जातील. दुसरी समिती खाद्यतेल विक्रेते, उत्पादक, पुन्हा पॅकिंग व्यावसायिक आणि अन्य संबंधित घटकांसाठी आवश्यक व्यवस्था व सुविधा निर्माण करण्याबाबत उपाययोजना सुचवेल.

# पाकिस्तानचे बालिश चाळे!

## आधी क्रॉप करून मोदींना फोटोबाहेर काढलं, ट्रोल झाल्यावर शहबाज शरीफ यांचा यू टर्न

■ मुंबई (दै. संध्या)



किर्गिझस्तानची राजधानी बिश्केक येथे आयोजित 26 व्या शंघाई सहकार्य संघटना शिखर परिषदेदरम्यान पाकिस्तानच्या नाकर्तेपणाचे आणखी एक उदाहरण जगासमोर आले आहे. पाकिस्तानी पंतप्रधान शहबाज शरीफ यांच्या कार्यालयाने SCO परिषदेचा एक क्रॉप केलेला फोटो सोशल मीडियावर शेअर केला. या फोटोमध्ये जगातील अनेक प्रमुख नेत्यांना क्रॉप करून हटवण्यात आले होते, जेणेकरून शहबाज शरीफ हे फ्रेमच्या मध्यभागी दिसू शकतील. या एडिटेड फोटोमधून भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांना थेट क्रॉप करून गायब करण्यात आले होते. मात्र, या बालिश प्रकारामुळे जगभरातून थट्टा उडाल्यानंतर आणि सोशल मीडियावर तुफान ट्रोलिंग झाल्यानंतर शेवटी शहबाज शरीफ यांनी पुन्हा सर्व जागतिक नेत्यांचा मूळ फोटो स्वतः शेअर करत यू-टर्न घेतला. बिश्केक येथील 26 व्या एससीओ शिखर परिषदेच्या सत्रापूर्वी काढण्यात आलेल्या मूळ फोटोमध्ये एससीओचे सर्व सदस्य देश आणि वरिष्ठ अधिकारी एकत्र उभे होते. यामध्ये एससीओ सरचिटणीस नुरलान येरमेकबायेव, बेलारूसचे अध्यक्ष अलेक्झांडर लुकाशेंको, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान, कझाकस्तानचे अध्यक्ष कासिम-जोमार्ट तोकायेव, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग, किर्गिझ अध्यक्ष सादिर जापारोव, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन, पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ, तजिकिस्तानचे अध्यक्ष इमोमाली रहमोन, उझबेकिस्तानचे अध्यक्ष शवकत मिर्झियोयेव आणि एससीओ प्रादेशिक दहशतवादविरोधी रचनेचे प्रमुख उलरबेक शारशेव उपस्थित होते. मात्र, पाकिस्तानने 'सिलेक्टिव्ह फ्रेमिंग'चा वापर करत शहबाज शरीफ यांना फक्त काही ठराविक नेत्यांसोबत सेंटरमध्ये दाखवण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. आंतरराष्ट्रीय स्तरावर नाचक्की झाल्यानंतर पाकिस्तानला आपली चूक सुधारावी लागली. दुसरीकडे, एससीओच्या मंचावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी (1 सप्टेंबर 2026) दहशतवादाच्या मुद्द्यावरून पाकिस्तानला उघडे पाडले. जे देश सरकारी धोरण म्हणून दहशतवादाचा वापर करतात, अशा देशांचा एससीओने ठामपणे सामना केला पाहिजे, असे स्पष्ट वक्तव्य पीएम मोदी यांनी केले. तसेच दहशतवादाला होणारा वित्तपुरवठा आणि दहशतवाद्यांच्या भरतीविरोधात लढताना दुटप्पी निकष लावणे थांबवले पाहिजे, असेही ते म्हणाले.

## संध्या प्रहार




## थोडक्यात...

### ६ वर्षाच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार

दौंड : दैनिक संध्या

दौंड तालुका नानगाव येथील अल्पवयीन सहा वर्षाच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करू तिला जीवे मारून विहिरीमध्ये फेकून दिले. नानगाव येथील ऊस गुराळावरती ऊसतोड कामगारांमध्ये आई-वडील घरी नसल्याचा फायदा घेऊन टोळी कामगाराच्या मुलाने लैंगिक अत्याचार करून तिला जीवे मारून पुरावा नष्ट करण्याचे काम केले असल्याची घटना नानगावमध्ये घडली आहे या घटनेने दौंड तालुक्यातील नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे सदर ही घटना सोमवार 31 ऑगस्ट रोजी संध्याकाळी चार वाजता घडली असल्याची माहिती यवत पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर यांनी दैनिक संध्या प्रतिनिधी संजय सोनवणे यांना दिली.

### राखी बांधून परतताना अपघातात मृत्यु

शिरूर : दैनिक संध्या

रक्षाबंधनासाठी बहिणीकडे गेलेल्या भावाचा राखी बांधून घरी परतताना दूचाकीच्या अपघातात मृत्यु झाला. तालुक्यातील करडे-रांजणगाव या अष्टविनायक मार्गावर आज सकाळी हा अपघात उघडकीस आला. या दूर्घटनेप्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. शंकर तुकाराम काळे (वय-२८, रा. करडे, ता. शिरूर, जि. पुणे) असे दूचाकी अपघातात मृत्युमुखी पडलेल्या तरूणाचे नाव असून, त्यांचे दाजी विकी गोरख बुर्डे (रा. चऱ्होली बुद्रूक, ता. हवेली, जि. पुणे) यांनी याबाबत माहिती दिल्यानंतर शिरूर पोलिस ठाण्यात या अपघातात प्रथमदर्शनी अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, मूळचे पिंपरी (पुणे) येथील रहिवासी असलेले शंकर काळे हे करडे येथील एसव्हीएफ रेफ कॉम प्रा. लि. या कंपनीत कामाला होते व गेल्या काही महिन्यांपासून आई शांता तुकाराम काळे यांच्यासह करडे येथेच वास्तव्यास होते.

# नागरिकांच्या आरोग्याशी खेळ; पॅकेटवरील एक्स्पायरी डेट बदलून खाद्यपदार्थांची विक्री

## ११ कंपन्यांविरुद्ध कारवाई

■ नवी मुंबई (दै. संध्या)




राज्यात एकीकडे अन्न व औषध प्रशासन विभागाकडून कारवाईचा धडाका सुरू असून भेसळयुक्त पदार्थ आणि अस्वच्छतासह खाद्यपदार्थांसदर्भातील मानांकन न पाळणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. त्यातूनच, अनेक हॉटेल्स आणि दुकानांना सील ठोकण्यात आल्याचंही पाहायला मिळालं. त्यामुळे, अधिकारी तुकाराम मुंढेंच्या कारवाईचा धसका अनेकांनी घेतलाय. मात्र, नवी मुंबईत नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या एका गंभीर प्रकाराचा पर्दाफाश झाला आहे. विविध नामांकित कंपन्यांच्या खाद्यपदार्थांच्या पॅकेटवरील मॅन्युफॅक्चरिंग डेट, बेस्ट बिफोर आणि एक्सपायरी डेटमध्ये बेकायदेशीरपणे फेरफार करून, त्याच खाद्यपदार्थांची विक्री आणि निर्यात केली जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. याप्रकरणात पोलिसांच्या गुन्हे शाखेने एकास अटक केलीय. नवी मुंबई गुन्हे शाखेने तुर्भे येथील टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील एका गोदामावर छापा टाकला होता. या कारवाईदरम्यान खाद्यपदार्थांच्या मूळ पॅकेटवरील उत्पादन आणि एक्सपायरीची माहिती तपासण्यात आली असता जुन्या तारखा बदलून पॅकेटवर नव्या तारखा छापण्यासाठी डेट प्रिंटिंग मशीनचा वापर केला जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. याबाबत अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन अश्या कारखान्यावर संयुक्त कारवाई करण्यात आली. 6 दिवसांत करण्यात आलेल्या तपासणीत एकूण 18 निर्यातदारांचा सुमारे 2 कोटी 46 लाख 53 हजार 354 रुपयांचा माल तपासण्यात आला. त्यापैकी 11 निर्यातदारांच्या सुमारे 75 लाख 21 हजार 269 रुपयांच्या मालावरील लेबल आणि पॅकेटवरील उत्पादन तारीख, एक्सपायरी/बेस्ट बिफोर तारीख, बॅच नंबर आणि एमआरपीमध्ये बदल केल्याचं समोर आलं. पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनाच्या या कारवाईत तुर्भे पोलीस ठाण्यात अन्न सुरक्षा व मानके कायदा तसेच भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान तारखा छापण्यासाठी वापरण्यात येणारी मशीन, विविध नामांकित कंपन्यांचे खाद्यपदार्थ आणि इतर साहित्य असा एकूण 75 लाख 21 हजार 269 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# मंत्री जयकुमार गोरेंचा ताफा अडवला

## मराठा बांधवांची थेट गाडीखाली उडी; पालकमंत्र्यांची एसपी अंजना कृष्णांशी चर्चा



■ सोलापूर (दै. संध्या)

अंतरवाली सराटीत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू असून आज उपोषणाचा चौथा दिवस आहे. जरांगे पाटलांची तब्येत खालावत असल्याने राज्यभरात मराठा बांधव आक्रमक होत असून आज धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यातही मराठा बांधवांनी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी वेगळ्या आंदोलनाचा प्रयत्न केला. धाराशिवमध्ये मराठा बांधव सामाजिक न्याय विभागाच्या उंच इमारतीवर चढले होते. तर, सोलापुरात पालकमंत्री जयकुमार गोरेंचा ताफा अडवत मराठा आंदोलकांनी घोषणाबाजी केली.

माढा तालुक्यातील टेभुर्णी येथे चार ते पाच मराठा आंदोलकांनी ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांची गाडी अडवून थेट गाडी समोर येऊन गाडी खाली घुसण्याचा प्रयत्न केलाय. यावेळी, पालकमंत्री जयकुमार गोरेसमवेत माढ्याचे माजी खा.रणजितसिंह नाईक निंबाळकर हे देखील गाडीत होते. माजी आमदार बबनराव शिंदेंच्या सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमासाठी जात असताना मराठा आंदोलकांनी मंत्र्यांचा ताफा अडवत हे आंदोलन केलं. एक मराठा लाख मराठासह मनोज जरांगे पाटलाच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करुन गाडी समोर आडवे झोपून गाडी खाली घुसण्याचा प्रयत्न झाला. या घटनेनंतर जिल्ह्यातील मराठा बांधवात चर्चा सुरू झाली असून पोलीसही सतर्क आहेत. दरम्यान, सोलापुरात पोलिसांनी मंत्र्यांच्या कारसमोर आलेल्या कार्यकर्त्यांना बाजूला केल्यानंतर पालकमंत्र्यांचा ताफा पुढे रवाना झाला.

माढ्याचे माजी आमदार बबन शिंदे यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाला जाताना जयकुमार गोरेंचा ताफा अडवण्याचा प्रयत्न झाला. त्यानंतर, ते कार्यक्रमस्थळी पोहोचले, यावेळी व्यासपीठावर बसले असता सहाय्यक पोलिस अधीक्षक अंजना कृष्णा यांच्याशी त्यांनी चर्चा केली. ताफा अडवल्यानंतर जयकुमार गोरे अलर्ट मोडवर असल्याचं दिसून आलं, तत्काळ सहाय्यक पोलिस अधीक्षक अंजना कृष्णा यांच्याशी त्यांनी चर्चा कली.

### शहाजी बापू आंतरवालीत, अश्रू अनावर

सांगोला विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार शहाजी बापू पाटील हे मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी अंतरवाली सराटीत दाखल झाले. यावेळी, मनोज जरांगे पाटील यांची खालावलेली प्रकृती पाहून शहाजी बापू पाटील यांना अश्रू अनावर झाल्याचं दिसून आलं. तसेच, थेट मंत्री शंभुराजे देसाई यांना कॉल करून मनोज जरांगे पाटलांची प्रकृती बघवत नसल्याचंही शहाजी बापूंनी म्हटलं. आमच्या पोरांनी जगायचं कसं? देशभरातील मराठा समाजाचे डोळे आणि कान अंतरवलीकडे लागले आहेत, एकनाथ शिंदे साहेब तळमळीने प्रयत्न करत आहे, पांडुरंगाची शप्पथ घेऊन सांगतो, असेही शहाजी बापूंनी म्हटले.

# शिवाजी महाराजांसोबत तुलना मोदींनाही आवडणार नाही

## *अमित ठाकरेंनी फोटो हटवला, एकनाथ शिंदे स्पष्टच बोलले*

■ नवी दिल्ली (दै. संध्या)



दिल्लीत येण्यासाठी विषय पाहिजे असं काही नाही, मी येत असतो. काही ठिकाणी स्थानिक निवडणुका आहेत, त्याचा आढावा घ्यायचा आहे. तसेच, शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत सुप्रीम कोर्टात उद्यापासून जी सुनावणी होत आहे, त्यामध्ये शिवसेनेमार्फत आपली बाजू मांडली जात असून त्याचा आढावा घ्यायचाय, अशी माहिती एकनाथ शिंदेंनी दिल्ली दौऱ्यासंदर्भातील विचारलेल्या प्रश्नावर दिली. यावेळी, पुण्यात मनसेकडून अमित ठाकरेंच्या नेतृत्वात महाविद्यालयातील कार्यालयात पंतप्रधान नरेंद्र मोदींचा फोटो हटविल्याच्या घटनेसंदर्भात विचारलेल्या प्रश्नावरही एकनाथ शिंदेंनी भूमिका मांडली. पुण्यातील एका पॉलिटेक्निक महाविद्यालयात अमित ठाकरे मुख्याधापकांच्या कार्यालयात उभे असताना एका विद्यार्थ्याने छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेजारी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा फोटो लावल्याचे निदर्शनास आणून दिले. तेव्हा अमित ठाकरे यांनी शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाजूला नरेंद्र मोदी यांचा फोटो कशाला, असे मुख्याधापकांना विचारले. एवढेच नव्हे तर पुढच्याच क्षणाला मनसेच्या प्रशांत कनोजिया, विक्रांत भिलारे या कार्यकर्त्यांनी नरेंद्र मोदी यांचा फोटो तिथून खाली उतरवला. त्यानंतर, याप्रकरणी आता गुन्हा दाखल करण्यात आला असून भाजपच्यावतीने आज मनसेविरुद्ध आंदोलन करण्यात आले. त्याच अनुषंगाने एकनाथ शिंदेंना प्रश्न विचारण्यात आला होता.

एकनाथ शिंदे म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवाजी महाराजांना दैवतासमान आदर दिलाय, त्यांनी नौदलाच्या ध्वजावर देखील शिवाजी महाराजांना स्थान दिलंय. सरकार स्थापन करतानाही त्यांनी शिवाजी महाराजांमुळे स्थापन झालंय असं म्हटलं. शिवाजी महाराजांसोबत तुलना मोदींनाही आवडणार नाही, पण एक प्रोटोकॉल असतो, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी पुण्यातील घडलेल्या घटनेवर भाष्य केलं. तसेच, प्रोटोकॉलनुसार राष्ट्रपती आणि पंतप्रधानांचा फोटो कार्यालयात लावला जातो, असेही शिंदेंनी सांगितले. मनसेचे युवा नेते अमित ठाकरे यांनी पुण्यातील एका महाविद्यालयातील कार्यालयातून शिवाजी महाराजांच्या शेजारी असलेला पंतप्रधान नरेंद्र मोदींचा फोटो हटवायला सांगितला होता. त्यानंतर, मनसैनिकांनी तो फोटो हटवल्याने चांगलाच वाद निर्माण झाला आहे. आता, एकनाथ शिंदेंनी या वादावर भाष्य केलंय. धनुष्यबाण बाळासाहेबांना प्राणाहून प्रिय होता, त्यांनी हिंदुत्व गोठवलं, बाळासाहेबांचे विचार गोठवले आता धनुष्यबाण गोठवायची मागणी करतायत, असे म्हणत ठाकरेंच्या शिवसेना पक्षाकडून धनुष्यबाण गोठवण्याची जी मागणी करण्यात आली. त्यावरुन, एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर पन्हा एकदा टीकेचे बाण चालवले. न्यायदेवतेवर आमचा विश्वास आहे, जनतेनेदेखील आम्हाला भरभरून विश्वास दिलेला आहे. शेवटी घटना आहे, पक्षाची घटना आहे, लोकशाही आहे, त्यामुळे शिवसेनेच्या वतीने सुनावणी सुरू झाली की उत्तरं मिळतील, असेही एकनाथ शिंदेंनी म्हटले.

मनोज जरांगे यांच्याबद्दल मी माझी भूमिका परभणीत मांडली आहे, गेल्या अनेक वर्षांपासून त्यांना खऱ्या अर्थाने, ज्या काही अडचणी आहेत, त्या मी जवळून पाहिल्या आहेत. मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण देण्याचा निर्णय आम्ही घेतला, मी मुख्यमंत्री असतानाच्या काळात हा निर्णय घेतला गेला. मराठा तरूणांना नोकऱ्या दिल्या, कुणबी प्रमाणपत्र जे कायद्याने देय आहे, तीही दिली जात नव्हती. त्यासाठी, मी शिंदे समिती गठीत केली, त्या माध्यमातून कुणबी प्रमाणपत्र देण्याचा प्रयत्न केला. इतर समाजावर अन्याय न करता आरक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे. मनोज जरांगेंनीही सकारात्मक भूमिका घ्यायला हवी, असे म्हणत अंतरवालीतील उपोषणावरूनही एकनाथ शिंदेंनी आपली भूमिका मांडली.

# चौकात चल तुला दाखवतो!

■ कोल्हापूर (दै. संध्या)

कोल्हापूर महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाच्या बैठकीत महायुतीमधील अंतर्गत वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. राज्यात आणि महापालिकेत सत्तेत एकत्र असूनही शिवसेनेचे गटनेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांमध्ये तुफान खडाजंगी झाली. बैठकीदरम्यान थेट 'खाली चौकात चल, तुला दाखवतो' अशी धमकी देत एकमेकांकडे पाहून शड्डू ठोकल्याने महापालिकेत प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. नगरसेवकांच्या या कृतीमुळे महापालिकेची बैठक आहे की कुस्तीचा आखाडा, असा प्रश्न अनेकांना पडला. कोल्हापूर महापालिकेत मंगळवारी वृक्ष प्राधिकरणाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या शेवटच्या सत्रात राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते आदिल फरास यांनी वृक्षतोडीसंदर्भात एक प्रस्ताव मांडला होता. मात्र, शिवसेनेचे गटनेते शारंगधर देशमुख यांनी या प्रस्तावाला तीव्र विरोध दर्शवला. आपण मांडलेल्या प्रत्येक प्रस्तावाला जाणीवपूर्वक विरोध केला जात असल्याचा आरोप आदिल फरास यांनी केला. यावरून दोन्ही नेत्यांमध्ये शाब्दिक चकमक सुरू झाली आणि पाहता पाहता वाद अत्यंत विकोपाला गेला. यापूर्वी परिवहन सभापती निवडीनंतरही या दोन नेत्यांमध्ये महापालिकेच्या सभागृहात मोठा वाद झाला होता. आजच्या बैठकीत हा जुना वाद पुन्हा उफाळून आला. वाद इतका वाढला की, दोन्ही नेत्यांनी एकमेकांना थेट बघून घेण्याची भाषा वापरली. महापालिकेच्या बैठकीतच एकमेकांकडे पाहून शड्डू मारण्यात आले.

## संपादकीय

# विकासाच्या वेगाला पर्यावरणाची दिशा हवी!

देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढत आहे. महामार्ग, रेल्वे, मेट्रो, औद्योगिक प्रकल्प, गृहनिर्माण आणि डिजिटल पायाभूत सुविधांचा विस्तार झपाट्याने होत आहे. विकासाची ही गती निश्चितच स्वागतार्ह आहे; मात्र या वेगाला पर्यावरणीय शाश्वततेची दिशा नसेल, तर आजचा विकास उद्याच्या संकटाचे कारण ठरू शकतो. त्यामुळे आता प्रश्न विकास हवा की पर्यावरण, असा नसून विकास आणि पर्यावरण यांचा समतोल कसा साधायचा, हा असायला हवा.

गेल्या काही वर्षांत हवामानातील बदल अधिक स्पष्टपणे जाणवू लागले आहेत. अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, उष्णतेच्या लाटा, दुष्काळ, पूर, भूस्खलन आणि बदलते ऋतुचक्र यांचा परिणाम शेतीपासून शहरांच्या दैनंदिन जीवनापर्यंत सर्वत्र दिसतो. यामध्ये नैसर्गिक कारणांसोबतच अनियंत्रित नागरीकरण, वृक्षतोड, जलस्रोतांवरील अतिक्रमण आणि वाढता औद्योगिक दबाव यांचाही मोठा वाटा आहे.

विशेषतः शहरांच्या विस्ताराचा प्रश्न गंभीर आहे. विकासकामांसाठी झाडे तोडली जातात, डोंगरांचे सपाटीकरण होते, नाले बुजवले जातात आणि मोकळ्या जागा काँक्रीटच्या जंगलात बदलतात. त्यानंतर पावसाळ्यात पाणी तुंबले की प्रशासनाकडून आपत्कालीन उपाययोजना केल्या जातात. पण मूळ प्रश्नांकडे दुर्लक्ष होते. निसर्गाची व्यवस्था उद्ध्वस्त करून नंतर आपत्ती व्यवस्थापनावर कोट्यवधी रुपये खर्च करण्यापेक्षा निसर्गाचे संरक्षण करणे अधिक शहाणपणाचे आहे.

महाराष्ट्रासारख्या राज्यात हा मुद्दा विशेष महत्त्वाचा आहे. एकीकडे औद्योगिकीकरण आणि नागरीकरण आवश्यक आहे; दुसरीकडे पश्चिम घाट, नद्या, तलाव, शेतीची जमीन आणि जैवविविधता ही राज्याची नैसर्गिक संपत्ती आहे. या संपत्तीचे नुकसान करून झालेला विकास कितीही भव्य असला, तरी तो दीर्घकाळ टिकणारा ठरणार नाही. पर्यावरण संरक्षण म्हणजे विकासाला विरोध करणे नव्हे. उलट पर्यावरणपूरक विकास हाच भविष्यातील खरा विकास आहे. सौरऊर्जा, पावसाचे पाणी साठवणूक, सांडपाण्याचा पुनर्वापर, कचऱ्याचे वर्गीकरण, सार्वजनिक वाहतूक, इलेक्ट्रिक वाहने, हरित इमारती आणि शाश्वत शेती यांसारख्या उपायांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. उद्योगांनीही केवळ नफा नव्हे, तर संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि पर्यावरणीय जबाबदारी यांना आपल्या व्यवसायाचा अविभाज्य भाग मानले पाहिजे. यामध्ये नागरिकांची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. रस्त्यावर कचरा टाकू नये, पाण्याचा अपव्यय टाळावा, प्लास्टिकचा वापर कमी करावा, वृक्षसंवर्धन करावे आणि स्थानिक पर्यावरणीय प्रश्नांबाबत जागरूक राहावे. पर्यावरण वाचविण्याची जबाबदारी केवळ सरकार किंवा पर्यावरण संस्थांची नाही; ती प्रत्येक नागरिकाची आहे. सरकारनेही पर्यावरणीय नियम केवळ कागदावर ठेवण्याऐवजी त्यांची कठोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. विकास प्रकल्पांना परवानगी देताना त्यांचा दीर्घकालीन पर्यावरणीय परिणाम गांभीर्याने तपासला पाहिजे. नदीपात्र, डोंगर, जंगल आणि जलस्रोत यांच्याशी तडजोड करून उभारलेले प्रकल्प भविष्यात किती मोठी किंमत मोजायला लावू शकतात, याचे भान नियोजनकर्त्यांनी ठेवले पाहिजे. आज आपण निसर्गाकडून घेत असलेल्या प्रत्येक संसाधनाचा हिशेब पुढच्या पिढीला द्यावा लागणार आहे. विकासाच्या नावाखाली भविष्यातील पिढ्यांचा हक्क हिरावून घेणे म्हणजे प्रगती नव्हे. आर्थिक समृद्धीबरोबर स्वच्छ हवा, शुद्ध पाणी, हिरवाई आणि सुरक्षित पर्यावरण मिळाले, तरच विकासाला खरा अर्थ प्राप्त होईल. म्हणूनच आता विकासाची व्याख्या बदलण्याची वेळ आली आहे. अधिक काँक्रीट, अधिक इमारती आणि अधिक रस्ते म्हणजेच विकास असे समीकरण नको. निसर्गाचे रक्षण करत, संसाधनांचा विवेकपूर्ण वापर करत आणि पुढच्या पिढ्यांसाठी सुरक्षित भविष्य निर्माण करत केलेला विकासच खऱ्या अर्थाने प्रगत समाजाची ओळख ठरेल.

## संस्कृत सुभाषित

अर्धभार्यामनुषस्य, भार्या श्रेष्ठसम. सखा

अर्थ : पुरुषाची अर्धांगिनी असणारी भार्या हीच त्याची श्रेष्ठ अशी सखा म्हणजे मित्र होय. असे सुभाषितकार म्हणतात. स्त्री ही अशा प्रकारे पुरुषाच्या बरोबरीने महत्त्वाची आहे.

## गुरु वचन

### खरा धर्म, संसाराची सेवा करणे

एकदा एक गुरू आपल्या काही शिष्यासोबत मेळ्यात गेले. त्यांनी पाहिले की, एका जागेवर बसून काही बाबा माळा फेरत होते. त्यांनी आपल्या समोर एक चादर अंथरलेली होती ज्यावर येणारे-जाणारे लोक पैसे टाकत होते. साधु डोळे बंद करून बसले होते जसे ध्यानात मग्न आहे. परंतु मधुन-मधुन ते थोड्यावेळेसाठी डोळे उघडून समोर अंथरलेल्या चादरीवर पाहत होते की, त्यावर किती पैसे जमा झाले. साधु असे करत होते हे पाहुन गुरू हसले. त्यांनी शिष्यांना पुढे चालण्यास सांगितले. पुढे एक तपस्वी शिर्षासन करत होते. तेथे खूप गर्दी जमा झाली होती. त्याला पाहून गुरूने जोरजोरात हसणे सुरू केले. पुन्हा ते आपल्या शिष्यांना घेऊन पुढे निघाले. पुढे एक पंडीत भगवत कथा सांगत होते. त्यांच्या समोर चेल्यांची मंडळी बसलेली होती. अधुन-मधुन जयकार लावुन आणि कीर्तन देखील करत होते. पुन्हा-पुन्हा कथाचे आयोजक लोकांना श्रद्धा-भक्तिपूर्वक दान देण्याचे निवेदन करत होते. कथाचे कार्यकर्ता दानपात्र घेऊन श्रोतांमध्ये फिरत होते आणि कथा ऐकणारे भक्त त्या पात्रात काही ना काही टाकत असे. त्याला पाहून गुरू पुन्हा खीळखीळून हसले.

त्याच्या पुढे एका चिकित्सा शिबिरात एक चिकित्सक रूग्णांच्या सेवेत लागलेला होता. गुरू काही वेळेपर्यंत तेथे थांबले. त्यांच्या डोळ्यात आश्रू आले. आश्रमला परत आल्यानंतर शिष्यांनी गुरूना पहिल्या तीन ठिकाणांवर हसणे व चौथ्या ठिकाणावर रडण्याचे कारण विचारले; तर गुरूने उत्तर दिले. आज माळा, आसन, प्राणायाम व भगवत कथेलाच धर्म समजून जास्त लोक सोंग करत आहे. हे पाहून मला हसू आले, तसेच भगवानचे कार्य करणारा फक्त एक चिकित्सक दिसला. हे पाहून दु:ख झाले की, लोक धर्माचे वास्तविक अर्थाला कधी समजतील? खरा धर्म संसाराची सेवा करणे आणि त्याला सुधारणे आहे, जप तप करणे नव्हे. गुरूच्या बाबींमध्ये सर्व शिष्यांना आपल्या प्रश्नाच्या उत्तरासोबत धर्माचा वास्तविक अर्थ समजण्याचा ज्ञान मिळाले.

## उपदेशकथा

### ऐट

एका गृहस्थाच्या घरी एक दिवस एक खास मित्राला मेजवानी होती. त्याचा एक कुत्रा होता. त्यानेही आपल्या एका दोस्त कुत्र्याला त्याच दिवशी आपल्याकडे जेवणाचे आमंत्रण दिले. तो कुत्रा जेव्हा आला तेव्हा तयार होत असलेले चमचमीत जेवणाचे पदार्थ पाहतच राहिला. त्याला आनंदाच्या उकळ्या फुटू लागल्या तो म्हणाला, काय मस्त मेजवानी मिळणार आज. अगदी पोट फुटेपर्यंत मी आज खाणार आहे. मग पुन्हा परवा सकाळपर्यंत पुन्हा खायला नको.

आपल्या मित्रांवरच प्रेम दाखविण्याकरता तो आपली शेपटी हालवत राहिला. पण त्या शेपटीच्या वळवळ्यामुळे तिथल्या स्वयंपाक्याचे लक्ष त्याच्याकडे गेले आणि त्याने ताबडतोब त्याचे पाय धरून त्याला घराबाहेर फेकून दिले. अर्थात रागाने आणि निराशेने भूकंत भूकंत तो आपल्या घरी निघाला. वाटेत त्याला त्याचा दुसरा मित्र भेटला. त्याने विचारले, काय कसं काय होत जेवण? काही विचारू नको, तो म्हणाला, अरे, तेथे इतकी दारू होती की, मी तिच्यावर ताव मारला. त्या घरातून मी कसा बाहेर पडलो ते देखील मला समजत नाही.

कथा उपदेश : दुसऱ्याच्या जीवावर जे जे आपल्याला चांगल्या गोष्टी देण्याचा आव आणतात त्यांच्यावर विश्वासून चालणे बरे नाही.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:भरणी २५:४२:४५+ |
| २ सप्टेंबर २०२६ | योग:ध्रुव २१:११:३३ |
| बुधवार | करण:गर १७:२१:३३ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:वणिज |
| आषाढ शके | २८:२६:२१+ |
| संवत्– १९४८ | सूर्य:सिंह |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:मेष |
| अयन– दक्षिणयन | हिजरी सन् – १४४८ |
| मास– आषाढ | मुस्लिम मास – रबिलावल |
| ऋतु– सौर शरद | तारीख – १९ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:षष्टी २८:२६:२१+ | बुधपूजन |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०५७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | | | 1 | | 2 | | |
| 6 | | | | | | | | 5 |
| 9 | | 2 | | | | | | 1 |
| 3 | 2 | | 4 | | 1 | 7 | 5 | |
| 1 | | | 3 | | 2 | | | 9 |
| | 6 | 9 | 7 | | 8 | | 3 | 2 |
| 2 | | | | | | 4 | | 3 |
| 5 | | | | | | | | 7 |
| | | 4 | | 3 | | | 9 | |

PRESS SERVICES OF INDIA

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०५६ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 3 | 7 | 9 | 1 | 6 | 8 | 4 | 2 |
| 9 | 6 | 8 | 2 | 4 | 5 | 1 | 7 | 3 |
| 1 | 4 | 2 | 7 | 8 | 3 | 6 | 9 | 5 |
| 2 | 1 | 9 | 5 | 6 | 8 | 7 | 3 | 4 |
| 8 | 5 | 6 | 4 | 3 | 7 | 9 | 2 | 1 |
| 4 | 7 | 3 | 1 | 9 | 2 | 5 | 8 | 6 |
| 3 | 2 | 1 | 8 | 5 | 9 | 4 | 6 | 7 |
| 7 | 8 | 5 | 6 | 2 | 4 | 3 | 1 | 9 |
| 6 | 9 | 4 | 3 | 7 | 1 | 2 | 5 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६६६ – लंडन येथे तीन दिवस चाललेल्या आगीत दहा हजार बिल्डिंग खाक झाली.
- १९४५ – वेतनामने स्वत:ला स्वतंत्र घोषित केले. डेमोक्रिटेक रिपब्लीक ऑफ वेतनाम (नॉर्थ वेतनाम) असे नाव ठेवले.
- १९९८ – पिग्गीस कोव येथे स्विस एअर फ्लाईट १११ या विमानाला अपघात होऊन त्यामधील सर्व २२९ लोक ठार झाले.
- २००६ – उत्तर श्रीलंकेकडील समुद्र तटाजवळ लष्कर आणि लिट्टे बंडखोरा यांच्यात झालेल्या युद्धात ८० बंडखोर ठार झाले.

### राष्ट्रीय

- २००६ – मुंबईच्या वास्तुतज्ञ आभा नारायण लांबा यांना १८३३ मध्ये बांधण्यात आलेल्या जे.जे.स्कूल ऑफ आर्टस अॅन्ड बिल्डिंगच्या नूतनीकरणासाठी युनेस्कोचा तिसरा पुरस्कार मिळाला.

### जन्म

- १९६५ – पार्थो सेनगुप्ता, बॉलीवुड चित्रपट निर्माता.
- १९७१ – पवन कल्याण, भारतीय अभिनेता.
- १९८८ – ईशांत शर्मा, भारतीय क्रिकेट संघाचा वेगवान गोलंदाज.

### निधन

- १७१५ – फ्रान्सीसको करावेरो लोपेस, पोर्तगालचे १३वे राष्ट्रपती.
- १९६९ – हु ची मीन, वेतनामचे राष्ट्रपती.
- २००७ – मॅक्स मॅकनब, राष्ट्रीय हॉकी लिग इक्सेकीटीव.
- २००८ – वेणुगोपाल, हिंदीचे प्रसिद्ध क्रांतिकारी कवी.
- २००८ – शारदा प्रसाद, माजी दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे माहिती सल्लागार आणि निकटवर्तीय सहकारी.

## : SMS :

Teacher: Agar future me 10 crore mile to kya karoge?
Pappu: Pehle screenshot lunga, phir sapna dekh raha hu pata chalega.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.० | २३.० |
| अहमदनगर | २९.५ | २२ |
| अकोला | ३२ | २४ |
| अमरावती | ३१ | २४ |
| बीड | ३१.५ | २३ |
| भंडारा | ३१.८ | २४ |
| बुलढाणा | ३१.५ | २३.७ |
| चंद्रपूर | ३१ | २४.२ |
| चेन्नई | ३३.५ | २६.५ |
| नवी दिल्ली | ३५ | २८.३ |
| धुळे | ३०.६ | २३४ |
| गोंदिया | ३०.८ | २४.६ |
| जळगाव | ३१.४ | २४.१ |
| कोल्हापूर | २७.८ | २२१ |
| लातूर | २९.६ | २३ |
| मुंबई | ३० | २६.८ |
| नागपूर | ३०४ | २४ |
| नांदेड | ३०.७ | २२.१ |
| नंदूरबार | ३० | २३.२ |
| नाशिक | २८ | २२.३ |
| पुणे | २८.५ | २२.८ |
| पंढरपूर | ३२.२ | २१.५ |
| सातारा | २८.८ | २१.५ |
| सांगली | २९.५ | २२.५ |
| सोलापूर | ३१.५ | २३.४ |
| वर्धा | ३५.२ | २६.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** महत्वाचे निर्णय घेण्यास व्यवसायातील महत्वाचे करार-मदार करण्यास आजचा दिवस चांगला आहे.

**तुळ :** हाताखालील कर्मचाऱ्यांचे उत्तम सहकार्य लाभेल. विरोधक व हितशत्रूंचे मनसुबे हाणून पाडण्यात यशस्वी व्हाल.

**वृषभ :** संततीसौख्य लाभेल. मुलामुलींसंदर्भात एखादी भाग्यकारक घटना घडेल. त्यांचे काही प्रश्न असल्यास ते मार्गी लावाल.

**वृश्चिक :** वाहने सावकाश व जपून चालवावीत. तुमची चीडचीड होणार आहे. आरोग्याच्या थोड्याफार तक्रारी जाणवतील.

**मिथुन :** आर्थिक लाभाचेदृष्टीने एखादी नवी योजना नजरेसमोर येईल. व्यवसायात नवीन कल्पना अंमलात आणू शकाल. दिवस फारसा अनुकूल नाही.

**धनु :** नातेवाईकांशी मतभेदाची शक्यता आहे. मानसिक अस्वास्थता जाणवेल. प्रकृतीकडे लक्ष द्यावयास हवे. प्रवास शक्यतो टाळावेत.

**कर्क :** जिद्दीच्या जोरावर तुम्ही तुमची आजची कामे पार पाडू शकाल. वाहने जपून व सावधानतेने चालवावीत. प्रवास टाळावेत.

**मकर :** नवीन हितसंबंध निर्माण होतील. अपेक्षित गाठीभेटी पडतील. सध्या आपणाला नातेवाईकांचे सहकार्य मिळणार नाही, हे गृहितच धरावयास हवे.


**सिंह :** महत्वाचे निर्णय नकोत. काहींची प्रगती होईल. आज तुम्हाला महत्वाच्या आर्थिक कामांत पत्नीचा सल्ला उपयोगी ठरणार आहे.

**कुंभ :** आज पूर्ण दिवस तुम्ही उत्साहाने व उमेदीने कार्यरत राहणार आहात. आरोग्य उत्तम राहील. व्यवसायात नवीन बाजारपेठ मिळवू शकाल.

**कन्या :** वैवाहिक सौख्य उत्तम लाभेल. मित्रांचे सहकार्य उत्तम लाभेल. अपेक्षित गाठीभेटी पडतील. उत्साह व उमेद वाढेल. प्रवास सुखकर होतील.

**मीन :** महत्वाचे निर्णय घेण्यास तसेच आगामी काळाचे नियोजनास दिवस अनुकूल आहे. हाताखालील कर्मचाऱ्यांचे उत्तम सहकार्य लाभेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०५७



### आडवे शब्द

१. उन्हाळ्यात दिलासा देणारा पाऊस
३. चामखीळ
४. पराजय
७. कौसल्यापुत्र
९. कर्ज देणारा
१०. नवरदेवाकडील मंडळी
१२. पंख
१३. कपडालत्ता
१६. तापविणारा सूर्य
१८. गुजराथी नृत्यप्रकार
१९. झोपडी
२०. भांडण
२१. बारा स्वारांच्या अक्षरांची मालिका उदा.क, का, की, कि, कु, कू, इत्यादी
२३. चप्पल
२४. लवकर, वेगाने
२६. ख्रिश्चन धर्माचे प्रमुख धर्मगुरु
२७. बारा वर्षांचा काळ
२९. कोर्टातील कथन
३०. गीत, नृत्य, वाद्य यांचा संगम
३२. नवरा (ग्रा.)
३५. रमणीय
३६. धुंदी
३८. ज्ञानेश्वरीत उल्लेखलेला एक पक्षी
४०. श्रीमंत
४१. एक क्षार
४२. रस काढण्याचे यंत्र
४४. चिंतन
४५. अंत:करण
४६. तेज
४८. मध्यभागी
५०. प्रत्येक दिवशी
५२. वांग्याचा खमंग पदार्थ
५३. गुरांचा समुदाय
५४. मऊ
५६. कौरव पांडवांची कथा
५८. पुरुष, शूर पुरुष
५९. समीक्षा
६२. मदनपत्नी
६३. कपटी
६८. एक पालेभाजी
६९. परमेश्वर
७०. चिंता
७२. मिठी
७३. एकदम पडलेला शेणाचा गोळा
७४. अजागळ
७६. आशीर्वाद
७९. एकत्रित रडणे
८०. सुगंध
८१. बारावी रास
८२. तानाजीला दिलेली पदवी, शूर पुरुष

### उभे शब्द

१. व्यर्थ बडबड, चऱ्हाट
२. लग्नासाठी जमलेले गणगोत
३. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेणारी संस्था (फक्त आद्याक्षरे)
३अ. फुरसत
४. पुन्हा पुन्हा
५. घर
६. आशीर्वाद
७. असुर
८. नामशेष
९. सर्प
११. दुसऱ्याकडे भोजन घेणे, व्रतकाळात हे पाप समजतात
१२. अनुमती
१४. वाढलेला व्याप
१५. वही
१७. सोंगट्यांचे वस्त्र
१९. झीज, नुकसान
२०. पोते
२१. दावा
२३. हेलपाटा
२५. पृथ्वी
२६. कुबड
२८. घागरा
३०. एकत्र गोळा करणे, जमविणे
३१. श्रीविष्णूचे नावडते फूल
३३. दशमुखी रावण
३४. चाक
३७. एक हिंस्त्र पक्षी
३८. झोंबणारे
३९. लिहिलेले वाचणारा
४०. सन्मानाची रक्कम
४३. पंकज
४४. माझे
४५. इच्छा
४७. अभिप्राय
४९. हत्यारांची, सामानाची पिशवी बहुदा न्हाव्याकडील
५०. इटलीची राजधानी
५१. लोखंड (हिंदी)
५२. ओहोटीच्या विरुद्ध
५३. पाषणहृदयी
५५. रसदार
५६. दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा
५७. हिंदुस्थान
५८. मौज
६०. फणसाचा एक प्रकार
६१. नागपूरचे प्रसिद्ध फळ
६३. गाजावाजा
६४. तोटी
६६. खिडकीची काच
६७. यावर्षी
६८. नोकर
७१. आयुष्य
७५. पुरे!
७७. मादीच्या विरुद्ध
७८. धातूचा जाड-बारीक धागा

### जम्बो शब्दकोडे क्र. १०५६ चे उत्तर

आडवे उत्तर : १.आर. आर. पाटील ६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत १२.हारजीत १४.सनगर १६.घण १७.विलोभनीय १९.नस २१.मज २४.टर २५.तन २७.रमराट २९.दामोदर ३१.धाक ३२.बदन ३३.रवरव ३५.सराईत ३७.जयद्रथ ३९.लाभ ४०.खर्व ४१.शरम ४३.रसवान ४५.नागर ४६.राबता ४८.वहाण ४९.लवकुश ५१.चर ५३.सजन ५४.गदा ५५.भारवाहक ५७.कस ५९.जबाबदारी ६१.पसरणी ६२.जलतरण ६४.पात ६५.घर ६६.मतदार ६८.आयकर ६९.पळपुटा ७०.घरंदाज ७२.माहितगार ७५.पदर ७७.रास ७९.शीरा ८०.वतनदार ८१.गेला बाजार

उभे उत्तर : १.रक्षण ३.आत ४.पाणलोट ५.लहानी ६.फौजी ७.जतन ८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत १५.नजरानजर १६.धनदाट १८.भरधाव २०.सरबत २२.जनपथ २३.उदरभरण २६.नवरा २८.मद ३०.रव ३४.रखवालदारी ३५.सर्वनाश ३६.ईश्वरचरणी ३८.यमराज ४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव ४७.बनकर ५०.कुरापत ५२.रवा ५३.सकल ५४.गदाधर ५५.भारतीय ५६.हजर ५८.सणवार ६०.बाबत ६३.तजवीज ६४.पातळ ६५.घरघर ६६.मधमाशी ६७.दानत ६८.आटा ६९.परत ७१.दादला ७३.हिरा ७४.गाव ७६.दगा ७७.राजा ७८.सर

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# महापौर सौ. मंजुषा नागपुरे यांच्या पुढाकारातून पुणे–जर्मनी शहर भागीदारीला नवी दिशा

## शहरी विकास, वाहतूक, कचरा व्यवस्थापन, तंत्रज्ञान आणि उद्योग क्षेत्रातील सहकार्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक

■ पुणे (दै. संध्या)



पुणे शहराच्या शाश्वत आणि सर्वांगीण विकासासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभव, आधुनिक तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण कार्यपद्धतींचा उपयोग करण्याच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकेच्या माननीय महापौर सौ. मंजुषा नागपुरे यांच्या पुढाकारातून पुणे आणि जर्मनीतील शहरांमध्ये धोरणात्मक सहकार्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले.

जर्मनीच्या फ्रँकफर्ट राईन-माईन प्रदेशातील राऊनहाईम, रसेल्सहाईम आणि केल्स्टरबाख या शहरांच्या प्रतिनिधीमंडळाने आज पुणे महानगरपालिकेस भेट देऊन माननीय महापौर सौ. मंजुषा नागपुरे यांच्यासोबत विविध क्षेत्रांतील सहकार्याच्या संधींबाबत सविस्तर चर्चा केली. यामध्ये शहरी विकास, वाहतूक, कचरा व्यवस्थापन, तंत्रज्ञान, नवोपक्रम, स्टार्टअप परिसंस्था तसेच लघु, मध्यम व सूक्ष्म उद्योगांचा विकास या विषयांना प्राधान्य देण्यात आले.

यावेळी बोलताना माननीय महापौर सौ. मंजुषा नागपुरे यांनी पुणे आणि जर्मनीतील शहरांमधील विद्यमान संबंध अधिक दृढ करण्याची आवश्यकता व्यक्त केली.

त्या म्हणाल्या, "पुणे आणि जर्मनीतील शहरांमधील सहकार्यामुळे तंत्रज्ञान, शहरी विकास, कचरा व्यवस्थापन, वाहतूक आणि सांस्कृतिक देवाणघेवाण या क्षेत्रांत नवीन संधी निर्माण होतील. पुण्याची उद्योग, तंत्रज्ञान, शिक्षण आणि नवोपक्रमाची क्षमता तसेच जर्मनीचा अनुभव यांचा समन्वय साधून दीर्घकालीन आणि परिणामकारक भागीदारी उभारण्याचा आमचा प्रयत्न आहे."

पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून शहर-ते-शहर भागीदारी, ज्ञानविनिमय, संस्थात्मक सहकार्य, व्यावसायिक संबंध आणि नागरिकांमधील परस्पर संवाद वाढविण्यावर भर देण्यात येणार असल्याचे महापौरांनी स्पष्ट केले. या बैठकीस राऊनहाईम, जर्मनीचे माननीय महापौर श्री. डेव्हिड रेंडेल, राईन-माईन इनोव्हेशन हबचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. स्टेफान विटेकिंड, जर्मन-इंडियन बिझनेस अलायन्सचे अध्यक्ष श्री. सेल्वकुमार पेरियासामी, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. निर्मल रामन कन्नैयन आणि एक्सपँडियर्सचे भारतातील भागीदार श्री. चारुदत्ता पांडे उपस्थित होते.

महापौर श्री. डेव्हिड रेंडेल यांनी पुणे आणि फ्रँकफर्ट राईन-माईन प्रदेशातील शहरांमध्ये विश्वास, आर्थिक सहकार्य, नवोपक्रम आणि परस्पर संबंधांवर आधारित दीर्घकालीन भागीदारी निर्माण करण्याची इच्छा व्यक्त केली.

बैठकीस महानगरपालिका आयुक्त श्री. नवल किशोर राम, भा.प्र.से., अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त सौ. पवनीत कौर, भा.प्र.से., शहर अभियंता श्री. अनिरुद्ध पावसकर, प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता श्री. दिनकर गोजारे, महापालिका सचिव सौ. योगिता भोसले आणि अधीक्षक अभियंता श्री. बिपिन शिंदे उपस्थित होते.

महानगरपालिका आयुक्त श्री. नवल किशोर राम, भा.प्र.से. यांनी पुण्याच्या शिक्षण, माहिती-तंत्रज्ञान, उद्योग, स्टार्टअप आणि कुशल मनुष्यबळाच्या मजबूत परिसंस्थेचा उल्लेख करून कृत्रिम बुद्धिमत्ता, शहरी प्रशासन, वाहतूक, कचरा व्यवस्थापन आणि शहरी नियोजन या क्षेत्रांत जर्मन शहरांच्या अनुभवाचा लाभ घेण्याची आवश्यकता व्यक्त केली.

पुण्याच्या वेगाने होणाऱ्या शहरी विकासाच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम कार्यपद्धती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून नागरी सेवांची गुणवत्ता, कार्यक्षमता आणि शाश्वतता वाढविण्यावर त्यांनी भर दिला.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त सौ. पवनीत कौर, भा.प्र.से. यांनी पुणे महानगरपालिकेची शहर-ते-शहर भागीदारी आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठीची बांधिलकी व्यक्त केली. जर्मन प्रतिनिधीमंडळाने पुण्यातील लघु, मध्यम व सूक्ष्म उद्योगांसाठी १२ महिन्यांच्या बाजारपेठ प्रवेश कार्यक्रमाचा प्रस्ताव मांडला. या कार्यक्रमाद्वारे पुण्यातील उद्योगांना बाजारपेठेचा अभ्यास, व्यवसाय प्रवेश धोरण, जर्मनीमध्ये व्यवसाय स्थापन करण्यासाठी मार्गदर्शन, व्यवसाय विकास तसेच संभाव्य युरोपियन ग्राहक आणि व्यावसायिक भागीदारांशी संपर्क साधण्यासाठी सहाय्य उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव आहे.

### चार प्रमुख क्षेत्रांना प्राधान्य

याचर्चेत पुढील चार क्षेत्रे सहकार्याच्या दृष्टीने प्राधान्याने निश्चित करण्यात आली:
लघु, मध्यम व सूक्ष्म उद्योगांचा विकास आणि युरोपियन बाजारपेठेत प्रवेश
कचरा व्यवस्थापन आणि परिपत्र अर्थव्यवस्था
शहरी नियोजन आणि पायाभूत सुविधा
शहरी वाहतूक आणि परिवहन व्यवस्था

यामुळे पुण्यातील उद्योगांना जर्मनीसह व्यापक युरोपियन बाजारपेठेत व्यवसाय विस्ताराच्या नवीन संधी उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. बैठकीत कचरा वर्गीकरण, पुनर्वापर, कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती, जैववायू निर्मिती आणि परिपत्र अर्थव्यवस्था या क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञान व ज्ञानाची देवाणघेवाण करण्याबाबत चर्चा झाली.

तसेच शाश्वत पायाभूत सुविधा, आधुनिक शहरी नियोजन आणि वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी जर्मन शहरांच्या अनुभवाचा उपयोग करण्याच्या शक्यतांवरही विचारविनिमय करण्यात आला.

दोन्ही बाजूंनी पुढील टप्प्यात विशिष्ट सहकार्य क्षेत्रे, संयुक्त कार्यक्रम, संस्थात्मक यंत्रणा आणि समन्वयासाठी नोडल पथके निश्चित करून या भागीदारीला ठोस स्वरूप देण्याबाबत सहमती दर्शविली. महापौर सौ. मंजुषा नागपुरे यांच्या पुढाकारातून झालेली ही बैठक पुणे शहराला जागतिक ज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग आणि नवोपक्रमाशी जोडण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरली असून, पुणे–जर्मनी संबंधांना दीर्घकालीन शहर भागीदारीचे स्वरूप देण्यासाठी या सहकार्यामुळे नवी दारे खुली होणार आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे




### लिटमॉसने नवीन कार्यालयाचे केले उद्‌घाटन; तंत्रज्ञान क्षमता बळकट करण्यासाठी

पुणे : दैनिक संध्या

जागतिक लर्निंग ॲक्सीलरेशन प्लॅटफॉर्म असलेल्या लिटमॉसने पुण्यात आपले नवीन कार्यालय परख हाऊस, ६ वा मजला, बोट क्लब रोड, बंड गार्डन, संगमवाडी, पुणे – ४११००१ येथे सुरू करून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. लिटमॉस एआय युगात १५० देशांमधील ११,००० हून अधिक संस्थांना त्यांचे कार्यबल, भागीदार आणि ग्राहकांमध्ये मानवी क्षमता निर्माण करण्यास मदत करते. हे नवीन स्थान भारतामध्ये एक मजबूत अभियांत्रिकी समुदाय निर्माण करण्याच्या दृष्टीने एक धोरणात्मक गुंतवणूक आहे. ती जगभरातील विद्यमान डेव्हलपर कार्यक्रमाला पूरक असून लिटमॉसच्या जागतिक तंत्रज्ञान क्षमतांचा विस्तार करणारी आहे. लिटमॉसचे मुख्य कार्यकारी अधिकारी एरिक व्हर्मिलियन, लिटमॉसचे सीटीओ ब्रायन सोबस आणि इंडिया ऑपरेशन्सचे संचालक सरबजीत सिंग यांच्या उपस्थितीत फीत कापून या कार्यालयाचे औपचारिक उद्‌घाटन करण्यात आले. लिटमॉसचे मुख्य कार्यकारी अधिकारी एरिक व्हर्मिलियन म्हणाले, "पुण्यातील आमच्या कार्यालयाची सुरुवात ही लिटमॉसच्या लोक, तंत्रज्ञान आणि जागतिक क्षमतांमध्ये सतत गुंतवणूक करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताकडे जगातील सर्वात सखोल आणि सर्वाधिक कुशल तंत्रज्ञान प्रतिभा आहे. इथे असाधारण अभियांत्रिकी कौशल्य, मजबूत शैक्षणिक पाया आणि जागतिक स्तरावरील जटिल आव्हाने सोडवण्याचा अनुभव आहे. विशेषतः पुण्यात अनुभवी व्यावसायिक आणि उदयोन्मुख प्रतिभा यांचा अपार साठा असल्यामुळे एक उत्साही तंत्रज्ञान परिसंस्था तयार झाली आहे. भारतामुळे आमच्या विद्यमान जागतिक अभियांत्रिकी प्रतिभेमध्ये सखोल अनुभवाची भर पडत असून या नवीन अध्यायामुळे निर्माण होणाऱ्या या शक्यतांबद्दल आम्ही उत्सुक आहोत." लिटमॉसच्या इंडिया ऑपरेशन्सचे संचालक सरबजीत सिंग म्हणाले, "या नवीन कार्यालयामुळे लिटमॉसला एकाच ठिकाणी एकत्र राहण्याचे खरे फायदे समजण्यास मदत होईल. यामध्ये स्वाभाविकपणे घडणारे मार्गदर्शन आणि ज्ञानाचे आदानप्रदान तसेच दूरून साध्य करता येणे अवघड असलेले शिक्षण आणि सहयोग यांचा समावेश आहे. पुण्यातील टीम स्वतःचे कौशल्य वाढवत असताना आणि लिटमॉसच्या जागतिक यशात योगदान देण्याची संधी प्राप्त करत असताना तिला पाठिंबा देण्याची ही संधी मिळाल्याबद्दल मी विशेष आनंदी आहे." पुण्यातील कार्यालयाचे हे उद्‌घाटन म्हणजे लिटमॉसमधील लक्षणीय वाढ आणि नावीन्यपूर्णतेच्या कालखंडाचा एक विस्तार आहे. त्याच्या उत्पादनांमधील सुधारणा, नवीन कार्यकारी नेमणुका आणि नवीन भागीदारी यांचा त्यात समावेश आहे. एक अग्रगण्य लर्निंग ॲक्सीलसरेशन प्लॅटफॉर्म म्हणून लिटमॉस आपले स्थान मजबूत करीत असून ती संस्थांना त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांपेक्षा वेगाने नवीन मानवी क्षमता शिकण्यास, जुळवून घेण्यास आणि कार्यान्वित करण्यास मदत करत आहे.

### 'जमतानी'च्या वचनाला मिळणार नवी, दमदार ओळख

पुणे : दैनिक संध्या

पुण्यातील विश्वासार्ह रिअल इस्टेट ब्रँड म्हणून आपली ओळख निर्माण केलेल्या जमतानीने आपल्या वाटचालीत एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. 'दिलेलं वचन म्हणजे ते पूर्ण करण्याची जबाबदारी' या साध्या पण ठाम विचारावर जमतानीने आपली विश्वासार्हता उभी केली आहे. वेळेत प्रकल्प पूर्ण करणे, दर्जेदार बांधकाम, विश्वासार्हता आणि ग्राहकांप्रती असलेली बांधिलकी या मूल्यांमुळे जमतानीने गेल्या १६ वर्षांत हजारो घरमालकांचा विश्वास संपादन केला आहे. आता कंपनी आपल्या विकासाच्या नव्या पर्वात प्रवेश करत असून, या नव्या प्रवासासाठी भारताचा लोकप्रिय आणि बहुआयामी अभिनेता रणवीर सिंग याची जमतानीच्या ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड करण्यात आली आहे. ही भागीदारी महत्त्वाकांक्षा, सातत्याने स्वतःमध्ये बदल घडवून आणण्याची वृत्ती आणि पारंपरिक चौकटी मोडून नवे काही करण्याच्या समान विचारांवर आधारित आहे. आपल्या दमदार अभिनयासाठी आणि स्वतःच्या मेहनतीने निर्माण केलेल्या यशस्वी प्रवासासाठी ओळखला जाणारा रणवीर सिंग हा जमतानीच्या पुढील वाटचालीतील दृष्टिकोनाशी उत्तम प्रकारे जुळणारा चेहरा आहे. पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या एका भव्य पत्रकार परिषदेत या भागीदारीची अधिकृत घोषणा करण्यात आली. यावेळी जमतानीच्या आतापर्यंतच्या प्रवासासह 'The Name is a Promise' – 'नाव म्हणजे एक वचन' या ब्रँडच्या तत्त्वज्ञानाचा आढावा घेण्यात आला आणि त्यानंतर रणवीर सिंगची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून अधिकृत घोषणा करण्यात आली.

## जुन्या पेन्शन योजनेसाठी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आंदोलनाचे रणशिंग



■ पुणे (दै. संध्या)

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त होऊन त्यानंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय समितीने निर्णायक आंदोलनाची घोषणा केली आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष मागणीकडे वेधण्यासाठी राज्यभर विविध टप्प्यांत आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाला नंदकुमार सागर - सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळ यांचा पाठिंबा असल्याची माहिती आज पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी प्रसाद गायकवाड- अध्यक्ष पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, शिवाजी कामथे- सचिव पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, राहुल पवार - अध्यक्ष कोल्हापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, आर. वाय. पाटील - सचिव कोल्हापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, सुनील भोर - सहसंपादक महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळ आदि मान्यवर उपस्थित होते.

## 'उर्गेन आर्ट फेस्टिव्हल'चे उत्साहात उद्‌घाटन

■ पुणे (दै. संध्या)



विशिष्ट समाजव्यवस्था आणि धार्मिकतेचा प्रचार करणाऱ्या कला आणि साहित्य त्यामुळे समाजामध्ये दुफळी निर्माण होते. पुण्याची ओळख ही अभिजात कलेसाठी आहे परंतु त्यामधून कधीही समानतेचा विचार मांडला जात नाही. समानतेचा विचार मांडून समाजामध्ये एकता, बंधुता निर्माण व्हावी यासाठी समानतेचा विचार मांडणाऱ्या दलीत साहित्य आणि कलेची समाजाला नितांत गरज असून त्यासाठी दलित कला आणि साहित्य चळवळ अधिक बळकट झाली पाहिजे असे मत विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनी व्यक्त केले. करुणादीप फाउंडेशन आणि त्रिरत्न वैरोचना सेंटर यांच्यातर्फे बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या उर्गेन आर्ट फेस्टिवल चे उद्‌घाटन डॉ. सुखदेव थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले, त्यावेळी ते बोलत होते . ज्येष्ठ चित्रकार सवींद्र सावरकर, विचारवंत राजू परुळेकर, करुणादीप फाउंडेशनचे प्रमुख डॉ . जीवक व्ही . डी गायकवाड, डॉ .अस्मिता गायकवाड, माजी पोलिस महासंचालक चंद्रशेखर दैठणकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. डॉ. सुखदेव थोरात म्हणाले , नाटक सिनेमा यांसह विविध परफॉर्मिंग आर्ट्स या समाजाचे प्रबोधन करून समता आणि विचार यांची भाषा बोलतात . त्यामधूनही समाज परिवर्तन घडू शकते. ब्राह्मणवादी विचार जाऊन समाजामध्ये समाजवादी आणि समतावादी विचार प्रस्थापित होत आहेत हीच एक प्रकारे परिवर्तनाची सुरुवात म्हटली पाहिजे या परिवर्तनाच्या चळवळीला आणखी बळकटी देण्यासाठी साहित्य कला यांच्यामार्फत दलितांचे दुःख समाजासमोर मांडले जाणे गरजेचे आहे.

## डेटा सेंटरच्या विस्तारासोबत पर्यावरणीय सुरक्षेलाही प्राधान्य द्या

पाणी, ऊर्जा व पर्यावरणीय परिणामांचा विचार करून शाश्वत धोरण आखण्याची नागरिक सोशल फाउंडेशनची शिफारस

■ पुणे (दै. संध्या)




भारतात डेटा सेंटर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) क्षेत्राचा झपाट्याने विस्तार होत असताना त्याचा पर्यावरण, जलस्रोत, ऊर्जा आणि स्थानिक पायाभूत सुविधांवर होणारा परिणाम गांभीर्याने विचारात घेण्याची गरज आहे. डेटा सेंटरचा विकास डिजिटल प्रगतीला चालना देणारा असला, तरी त्यासाठी पाणी, वीज, जमीन आणि कूलिंग सुविधांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याने शाश्वत विकासासाठी कठोर नियमन आवश्यक आहे. सरकारने याकडे लक्ष द्यावे, अशी शिफारस नागरिक सोशल फाउंडेशनने केंद्र व राज्य सरकारला केली आहे. अशी माहिती नागरिक सोशल फाउंडेशनच्या वतीने सर्वेश मेहेंदळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी अमेय सप्रे उपस्थित होते. "डिजिटल आणि AI क्षेत्रातील भारताची प्रगती आवश्यक आहे; मात्र या विकासासाठी पाणी, पर्यावरण आणि स्थानिक समुदायांच्या हक्कांशी कोणतीही तडजोड होता कामा नये," अशी स्पष्ट भूमिका नागरिक सोशल फाउंडेशनने यावेळी मांडली. भारतामध्ये जगातील जवळपास १६ टक्के डेटा निर्माण होतो; मात्र जागतिक डेटा सेंटर क्षमतेमध्ये भारताचा वाटा सुमारे १.२ टक्के आहे. त्यामुळे आगामी काळात डेटा सेंटरची संख्या आणि क्षमता मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. या विस्तारामुळे पाणीटंचाई, वाढते तापमान, प्रदूषण, ई-कचरा तसेच स्थानिक समुदायांवरील पायाभूत सुविधांचा दबाव वाढण्याची शक्यता फाउंडेशनने यावेळी व्यक्त केली आहे. डेटा सेंटरच्या एकूण वीज वापरापैकी सरासरी सुमारे १९ टक्के वीज कूलिंगसाठी खर्च होते, तर कमी कार्यक्षम केंद्रांमध्ये हा वाटा ३० टक्क्यांपेक्षा अधिक असू शकतो. १ मेगावॅट क्षमतेचे डेटा सेंटर दररोज सुमारे ६८,५०० लिटर पाणी वापरू शकते. भारतातील डेटा सेंटरचा एकूण पाणी वापर सध्या अंदाजे १५० अब्ज लिटर प्रतिवर्ष असून, २०३० पर्यंत तो ३५८ अब्ज लिटरपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.

संगणकीय उपकरणांमधून निर्माण होणाऱ्या उष्णतेमुळे काही भागांमध्ये 'डेटा हीट आयलंड'सारखे परिणाम दिसू शकतात. त्यामुळे डेटा सेंटर उभारण्यापूर्वी संबंधित भागाची वीज, पाणी, पर्यावरण आणि पायाभूत सुविधांची 'कॅरिंग कॅपॅसिटी' तपासणे आवश्यक असल्याचे फाउंडेशनने म्हटले आहे.

## आधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता वाढविणाऱ्या 'थॅलॅमस व्हेंचर्स'चा गौरव

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्रातील रुग्णालये, दवाखाने आणि विविध आरोग्यसेवा संस्थांपर्यंत आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान पोहोचविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या थॅलॅमस व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेडचा 'बीपीएल मेडिकल टेक्नॉलॉजीज'तर्फे आयोजित 'बीपीएल एलेव्हेट २०२६' या वार्षिक सन्मान सोहळ्यात गौरव करण्यात आला. वितरण क्षमता, ग्राहकांशी दृढ संबंध, तांत्रिक सहाय्य आणि आरोग्यसेवा वितरण व्यवस्थेतील योगदानाची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. बीपीएल समूहाच्या ५० वर्षांच्या वारशाचा भाग असलेल्या 'बीपीएल मेडिकल टेक्नॉलॉजीज'कडून वितरण भागीदारांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी 'बीपीएल एलेव्हेट' हे व्यासपीठ आयोजित केले जाते. यंदाचा उपक्रम 'एकत्रित प्रगती' या संकल्पनेवर आधारित होता. वैद्यकीय तंत्रज्ञानाची उपलब्धता वाढविण्यासोबतच आरोग्यसेवा पुरवठादारांना उपकरणांसह आवश्यक तांत्रिक आणि विक्रीनंतरचे सहकार्य उपलब्ध करून देणाऱ्या भागीदारांना या माध्यमातून सन्मानित करण्यात आले.

थॅलॅमस व्हेंचर्स ही वैद्यकीय उपकरणांच्या वितरण क्षेत्रात कार्यरत कंपनी असून, आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान आरोग्यसेवा क्षेत्रातील संस्थांपर्यंत पोहोचविण्यावर कंपनीचा भर आहे. विस्तृत वितरण जाळे, तांत्रिक कौशल्य आणि बाजारपेठेचा अनुभव यांच्या माध्यमातून कंपनी रुग्णालये, दवाखाने आणि आरोग्यसेवा संस्थांना विविध वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करून देते. ग्राहक आणि उत्पादक कंपन्यांशी दीर्घकालीन व्यावसायिक संबंध निर्माण करण्यावरही कंपनी विशेष भर देते.

## खरगे यांच्या सभास्थळाच्या शुद्धीकरणाचा काँग्रेसकडून तीव्र निषेध

■ पुणे (दै. संध्या)




अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या हल्दवानी, उत्तराखंड येथील सभेनंतर त्या जागी हिंदुत्ववादी उजव्या विचारसरणीच्या संघटनांनी गंगाजलाने शुध्दीकरण विधी केला. धक्कादायक बाब म्हणजे मल्लिकार्जुन खरगे हे या सभेत उपस्थित राहिल्याने त्या ठिकाणाची विटंबना झाली असल्याच्या करणावरून हे कृत्य करण्यात आले जे अत्यंत निंदणीय आहे.

या कृत्याच्या निषेधार्थ आज पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली झाशीची राणी पुतळा, बालगंधर्व चौक येथे आंदोलन करण्यात आले.

यावेळी अस्पृश्यता मुर्दाबाद, समता जिंदाबाद, दलितांचा अपमान सहन करणार नाही, सडक्या मनोवृत्तीचा तीव्र निषेध अशा स्वरूपाचे फलक दाखविण्यात आले. यावेळी बोलताना प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, "अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे देशाचे ज्येष्ठ नेते आहेत. अत्यंत गरीबी व कठिण परिस्थितीचा सामना करून त्यांनी राजकारणामध्ये प्रवेश केला आणि आपले संघटनात्मक कौशल्य व दांडग्या राजकीय अनुभवामुळे अनेक पदे भूषविली. विरोधी पक्ष नेते म्हणून राज्यसभेत जनतेचा प्रश्न अतिशय ठामपणे मांडत आहेत. हल्दवानी, उत्तराखंड येथे त्यांची यशस्वी सभा झाली. उजव्या विचारसरणीच्या संघटनांनी आपली मनुवादीवृत्ती दाखवून त्या सभेच्या ठिकाणी गंगाजलाने शुध्दीकरण विधी केला ही बाब अतिशय निंदणीय आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या अत्याचाराविरोधात देशभरात आंदोलन उभारले आणि सर्वधर्म समभावाचा संदेश दिला. त्यांनी दिलेल्या संविधानामुळे गोरगरीब कष्टकरी व मागासवर्गीयांना न्याय मिळाला. भेदभाव, अस्पृश्यता किंवा संविधानाने हमी दिलेल्या प्रतिष्ठा व समानतेला कमी लेखण्याचा कोणताही प्रयत्न काँग्रेस पक्ष कधीही स्विकारणार नाही. मल्लिकार्जुन खरगे यांच्या विरुध्द ज्यांनी हे जे कृत्य केले त्यांच्यावर उत्तराखंड सरकारने योग्य ती कायदेशिर कारवाई केली पाहिजे अन्यथा काँग्रेस पक्षाला तीव्र आंदोलन करणे भाग पडेल." यावेळी पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी पश्चिम विभागाच्या अध्यक्ष दीप्ती चवधरी, पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप, माजी मंत्री डॉ. विश्वजीत कदम, येशामती ठाकुर, महिला अध्यक्षा संध्या सव्वालाखे, गटनेते चंदूशेठ कदम, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष रमेश बागवे, मोहन जोशी, सुनिल मलके, नगरसेवक अरविंद शिंदे, रफिक शेख, विशाल मलके, साहिल केदारी, अश्विनी लांडगे, दिपाली डोख, वैशाली भालेराव, वीरेंद्र किराड, यशराज पारखी, मेहबुब नदाफ, चंद्रशेखर कपोते, राजाभाऊ कदम, लता राजगुरु, अविनाश बागवे, नीता रजपूत, स्नेहल पाडळे, नुरुद्दीन सोमजी, हनुमंत पवार, सचिन आडेकर, राजेंद्र भुतडा, महिला अध्यक्ष स्वाती शिंदे, युवक अध्यक्ष सौरभ अमराळे, द. स. पोळेकर, लतेंद्र भिंगारे, अक्षय जैन, बाळासाहेब अमराळे, रवि आरडे, शाबीर खान, राजू साठे, राज अंबिके, हर्षद हांडे, फैय्याज शेख, रवि ननावरे, संतोष देसाई, संजय मोरे, संतोष सुपेकर, दिपक ओव्हाळ, रमेश सोनकांबळे, रविंद्र माझीरे, अक्षय माने, शिवा भोकरे, राहुल वंजारी, अर्चना शहा, प्राची दुधाणे, अनिता धिमधिमे, सुंदर ओव्हाळ, शब्बीर शेख, दत्ता जाधव, सुनिल काळोखे, अनिल धिमधिमे, दादाश्री कामठे, संजय डोंगरे, प्रथमेश आबनावे आदींसह असंख्य काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

# थोडक्यात पण महत्वाचे

## चलती का नाम गाडी : मोटर इंडियाची एमजी हेक्टर टोमाहॉक ईव्ही लॉन्च

पुणे : दै. संध्या




जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाने हेक्टर टोमाहॉकचे अनावरण केले, जे त्यांच्या नव्याने विकसित केलेल्या ADAPT प्रणालीवर तयार केलेले पहिले उत्पादन आहे. प्रगत ड्राईव्ह आर्किटेक्चर प्लॅटफॉर्म टेक्नॉलॉजी आणि भारतातील पहिले मल्टी-न्यू एनर्जी व्हेईकल प्लॅटफॉर्म. इंटेलिजेंट टेक्नॉलॉजी, प्रीमियम आराम, प्रगत सुरक्षा आणि विद्युतीकृत कामगिरी यांचा मेळ साधणारी, एमजी हेक्टर टोमाहॉक इलेक्ट्रिक व्हेईकल आणि प्लग-इन हायब्रीड इलेक्ट्रिक व्हेईकल या दोन्ही पॉवरट्रेन पर्यायांसह उपलब्ध असेल.EV साठी ₹13.99 लाख + 4.90 रुपये/किमी बॅटरी भाडे आणि PHEV साठी ₹21.79 लाख + 3.20 रुपये/किमी बॅटरी भाडे या बॅटरी-ॲज-अ-सर्व्हिस प्रास्ताविक किमतीपासून सुरू होणारी, हेक्टर टोमाहॉक एमजीच्या NEV पोर्टफोलिओचा विस्तार करते. ही गाडी ग्राहकांना निवडीचे स्वातंत्र्य देते आणि त्याचबरोबर भारतीय कुटुंबांना आधुनिक SUV कडून अपेक्षित असलेली जागा, सुरक्षा आणि कनेक्टेड टेक्नॉलॉजी देखील पुरवते. हेक्टर टोमाहॉक हे भारतात एक शाश्वत गतिशीलता परिसंस्था (सस्टेनेबल मोबिलिटी इकोसिस्टम) उभारण्याच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. भारतीय ग्राहकांना जगातील सर्वोत्तम उपलब्ध तंत्रज्ञान आणि पर्यावरणदृष्ट्या जबाबदार उपाययोजना उपलब्ध करून देण्यावर कंपनी लक्ष केंद्रित करते.त्याचबरोबर देशाच्या स्वच्छ वाहतुकीकडे होणाऱ्या संक्रमणालाही पाठिंबा देत आहे. हेक्टर टोमाहॉक ईव्ही आणि भारतातील पहिले प्लग-इन हायब्रीड इलेक्ट्रिक वाहन हेक्टर टोमाहॉक PHEV सादर करणे, हे ग्राहकांच्या बदलत्या गरजा आणि ड्रायव्हिंगच्या पद्धतींना अनुरूप अशा नव्या युगातील गतिशीलता उपायांचा वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओ सादर करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

## असा लागला शोध : शॉपेनर

पुणे : दैनिक संध्या



पेन्सिलीचे टोक शार्प करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या शॉपेनरचा शोध १८२८ मध्ये फ्रान्सचे गणितज्ञ बर्नार्ड लॅसिमोन यांनी लावला.शॉपेनरचा शोध लागण्यापूर्वी लोक पेन्सिलीचे टोक करण्यासाठी छोटा चाकू किंवा सँडपेपर (कागदी काच) वापरत असत. चाकूने पेन्सिल तासणे वेळखाऊ आणि अवघड काम होते, ज्यामुळे पेन्सिलीची लाकडी बाजू सारखी जात नसे. २० ऑक्टोबर १८२८ रोजी पॅरिसमधील गणितज्ञ बर्नार्ड लॅसिमोन यांनी जगात पहिल्यांदा पेन्सिल शार्प करण्याच्या यंत्राचे पेटंट फ्रान्समध्ये घेतले.त्यांच्या या यंत्रामध्ये लाकडी ब्लॉकवर ९० अंशाच्या कोनात दोन छोट्या धातूच्या फाईल्स बसवलेल्या होत्या.पेन्सिल फिरवून घासल्यामुळे तिचे टोकदार होते, परंतु ही पद्धत फारशी सोयीची नसल्याने ती लोकांमध्ये लोकप्रिय झाली नाही. १८४७ मध्ये फ्रान्सच्या या सरदाराने एका शंकूच्या आकाराच्या घरात एक पाते बसवून हाताने वापरता येणारे सोपे शार्पेनर तयार केले.आज आपण वापरतो त्या छोट्या 'प्रिझम शार्पेनर'ची रचना याच डिझाइनवर आधारित आहे२३ नोव्हेंबर १८९७ रोजी अमेरिकेतील सुतार जॉन ली लव्ह यांनी खिशात बसेल अशा पोर्टेबल शार्पेनरचे पेटंट घेतले.याला "लव्ह शार्पेनर" म्हटले गेले.यात एक छोटे पाते होते आणि तासताना निघणारा लाकडाचा कचरा साठवण्यासाठी एक वेगळी डबी किंवा जागा होती. आजच्या काळातील लहान मुलांचे शार्पेनर याच डिझाइनचे प्रगत रूप आहे.

## एक्मो उपचारांमुळे जीवनदान

पुणे : दैनिक संध्या



देशभरात एच१एन१ (H1N1) आणि श्वसनसंस्थेच्या तीव्र संसर्गाचे रुग्ण वाढत असताना, वेळीच निदान आणि एक्मो (ECMO - Extracorporeal Membrane Oxygenation) सारख्या प्रगत उपचारांचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. डीपीयू (DPU) सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी येथील क्रिटिकल केअर मेडिसिन विभाग आणि २४/७ 'इसीएमओ रिट्रिव्हल टीम'ने अत्यंत बिकट प्रसंगात एका रुग्णाला यशस्वीरीत्या मृत्यूच्या दारातून बाहेर काढले आहे. रुग्णाला न्यूमोनियाची लक्षणे साधारणपणे पाच ते सात दिवसांपासून जाणवत होती आणि सुरुवातीला तो घरीच उपचार घेत होता. प्रकृती अधिक खालावल्याने त्याला ४ ऑगस्ट रोजी पुण्यातील एका खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यावेळी त्याला गंभीर श्वसन निकामी होण्याची अवस्था होती आणि त्याची ऑक्सिजन संतृप्तता ४० टक्क्यांपेक्षा कमी होती. ४ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे १०:३० वाजता डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या (ECMO) एक्मो ' टीमला आपत्कालीन कॉल प्राप्त झाला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून 'एक्मो रिट्रिव्हल टीम'ने तातडीने कार्यरत करण्यात आली. टीमने रेफर करणाऱ्या रुग्णालयात पोहोचून रुग्णाला स्थिर केले आणि त्याला सुरक्षितपणे डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये हलविण्याची प्रक्रिया सुरू केली. व्हेंटिलेटरवर असलेल्या आणि गंभीर श्वसन निकामी होण्याच्या अवस्थेतील रुग्णाला एका रुग्णालयातून दुसऱ्या रुग्णालयात हलविणे अत्यंत गुंतागुंतीचे असते. त्यासाठी स्थलांतरादरम्यान सतत क्रिटिकल केअर देऊ शकणाऱ्या अनुभवी रिट्रिव्हल टीम' ची आवश्यकता असते. आपत्कालीन कॉल मिळाल्यानंतर सुमारे चार तासांच्या आत, म्हणजे ५ ऑगस्ट रोजी पहाटे सुमारे २:०० वाजता, रुग्णाला 'व्हीव्ही एक्मो' (VV ECMO) वर ठेवण्यात आले आणि पुढील प्रगत अतिदक्षता उपचारांसाठी डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. ECMO (Extracorporeal Membrane Oxygenation) ही प्रगत जीवनरक्षक उपचारपद्धती असून ती तात्पुरत्या स्वरूपात फुफ्फुसांच्या कार्याला आधार देते. या प्रक्रियेत शरीरातील रक्त ECMO सर्किटमधून शरीराबाहेर फिरवले जाते. या प्रक्रियेदरम्यान रक्तामध्ये ऑक्सिजन मिसळला जातो आणि कार्बन डायऑक्साइड काढून टाकला जातो. त्यानंतर हे रक्त पुन्हा रुग्णाच्या शरीरात सोडले जाते. त्यामुळे मूळ आजारावर उपचार सुरू असताना फुफ्फुसांना विश्रांती घेऊन बरे होण्यासाठी वेळ मिळतो.

# एअरटेलकडून पोस्टपेड ग्राहकांना 'मिर्झापूर: द मूव्ही'च्या प्रीमियरची खास संधी

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

एअरटेलने आपल्या पोस्टपेड ॲडव्हांटेज क्लब अंतर्गत 'मिर्झापूर: द मूव्ही'च्या खास प्रीमियर अनुभवासाठी नोंदणी सुरू केली आहे. मुंबई, चंदीगड आणि लखनऊ येथील एअरटेल पोस्टपेड ग्राहक एअरटेल ॲपद्वारे नोंदणी करून चित्रपटाच्या प्रीमियरला उपस्थित राहण्याची संधी मिळवू शकतात. नोंदणी 2 सप्टेंबर 2026 पर्यंत सुरू राहणार आहे. मोबाइल कनेक्टिव्हिटीच्या नियमित फायद्यांपलीकडे जाऊन आपल्या पोस्टपेड ग्राहकांना मनोरंजनाचे खास अनुभव आणि प्रत्यक्ष कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या संधी देण्याच्या एअरटेलच्या प्रयत्नांचा हा एक भाग आहे. पात्र ग्राहक एअरटेल ॲप उघडून पोस्टपेड ॲडव्हांटेज क्लब विभाग किंवा 'मिर्झापूर: द मूव्ही'चे प्रमोशनल बॅनर शोधू शकतात. त्यानंतर स्क्रीनवर दिलेल्या सूचनांचे पालन करून नोंदणी पूर्ण करता येईल. एअरटेल पोस्टपेड ॲडव्हांटेज क्लब हा ग्राहकांशी जोडले जाण्यासाठीचा एक उपक्रम आहे. याअंतर्गत पात्र पोस्टपेड ग्राहकांना मनोरंजन, क्रीडा आणि विविध लाइव्ह इव्हेंट्समधील निवडक अनुभवांसाठी नोंदणी करता येते. या संधी शहर, मोहीम आणि उपलब्धतेनुसार वेगवेगळ्या असू शकतात. सामान्यतः नोंदणी एअरटेल ॲपद्वारे केली जाते. प्रत्येक अनुभवासाठी प्रवेश मर्यादित असू शकतो आणि त्यासाठी निवड प्रक्रिया तसेच लागू असलेल्या अटी व शर्ती असू शकतात. 'मिर्झापूर: द मूव्ही'च्या या प्रमोशनसाठी नोंदणी केल्याने प्रीमियरमध्ये प्रवेश निश्चित होत नाही. निवड झालेल्या सहभागींना कार्यक्रमाचे ठिकाण, वेळ आणि इतर लागू अटींबाबतची माहिती स्वतंत्रपणे दिली जाण्याची अपेक्षा आहे. ही संधी केवळ पात्र शहरांपुरती मर्यादित असून एअरटेलच्या अटी व शर्ती आणि निवड प्रक्रियेच्या अधीन आहे.




## दुर्मिळ नाण्यांचा ऐतिहासिक वारसा जपणारा बारामतीकर

■ बारामती (दै. संध्या)

२४०० वर्षांपूर्वीच्या भारतीय नाण्यांचा ऐतिहासिक वारसा बारामतीकर युवकाने जपला आहे. राकेश रंजना अनंतराव शहाणे असे या युवकाचे नाव आहे. २४०० वर्षांपूर्वीच्या दुर्मिळ नाणी व नोटांचा संग्रह केल्याने बारामतीकरांनी त्याला 'बारामतीचा कॉइनमॅन' हे नाव देखील दिले आहे.सातवीत असल्यापासून वयाच्या दहाव्या वर्षापासून राकेश यांनी हा अनोखा छंद जोपासला आहे. ते येथील बारामती सहकारी बँकेत नोकरीला आहेत. जुनी नाणी, नोटा गोळा करण्याचा हा छंद त्यांची ओळख बनू पाहत आहे. त्यांच्या पत्नी शिवकन्या यांचा देखील यामध्ये मोलाचा वाटा आहे. सध्या त्यांच्या संग्रहामध्ये २४०० वर्षांपासूनची दुर्मिळ नाणी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील सुवर्ण होन सह ८० प्रकारची नाणी, रायगडी शिवराई, डेटेड-डॉटेड शिवराई, दुदांडी शिवराई, संस्थानांची दुर्मिळ सुवर्ण, चांदी, रौप्य अशी नाणी, चंद्रगुप्त मौर्याच्या काळातील नाणं, मुघल, निजाम, खिलजीच्या काळातील नाणी, २०० देशातील नाणी व नोटा, भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या १००, ५०००, १०००० रुपयांच्या फापडा नोटा, जगभरातील २०० देशांच्या नोटा, पोस्टाचे तिकिटे आणि नाण्यांपासून बनवलेल्या वस्तू, समाज सुधारकांच्या वाढदिवसाची तारीख असलेल्या नोटा, भारताच्या १५० संस्थानांचे मोडी लिपीतील लिखाण केलेले स्टॅम्प पेपर , प्रत्येक संस्थानिक राजाचे नाणे इत्यादी यांचा इतिहासकालीन साठा आहे.




लहानपणी सातवीत असल्यापासून हा छंद राकेशने जोपासला आहे. या दुर्मिळ नाण्यांचा संग्रह करणाऱ्यांना नुमिसमॅटीस म्हणून ओळखले जाते. त्यांच्याकडून या नाण्यांचे लिलाव होतात. यातून, तसेच मित्रपरिवार, नागरिक, इतिहासप्रेमींकडून काही नाणी मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील नाणी सातारा, कोल्हापूर भागातून मिळविली आहेत. तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या काळातील नाणे संभाजीनगर येथून मिळविले. नवीन पिढीला आता डिजिटल व्यवहारामुळे या इतिहासकालीन नाण्यांची माहिती नाही. त्यामुळे पत्नी शिवकन्या यांच्या संकल्पनेतून बारामतीत प्रथमच त्यांनी प्रदर्शन आयोजित केले. शहरातील नटराज नाट्य कला मंदिर येथे हे सशुल्क प्रदर्शन भरवले गेले होते . यातून मिळणाऱ्या रकमेतून अर्धी रक्कम निराधार मुलांच्या मदतीसाठी वापरण्यात आली बँक ऑफ इंडियाने जारी केलेले १० रुपये ते १००० रुपयांचे चांदीची नाणी देखील त्यांच्या संग्रहात आहेत. शिवजयंती, गणपती उत्सवाला व इतर सर्व समाज सुधारकांच्या जयंतीला राकेश त्यांचा पूर्ण संग्रह प्रदर्शनात मांडण्यासाठी देत असतात. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराई चलनावर एक पुस्तक प्रकाशित केलेलं आहे. ट्रान्सनिस्ट्रीया या देशाने जगात प्रथमच प्लास्टिकची नाणी निर्माण केली आहेत. १ ,२ आणि १० रुपयांची ही नाणी बारामतीच्या प्रदर्शनात मांडण्यात आली होती बारामतीच्या इतिहासात प्रथमच नाण्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले यामध्ये ५ ते ६ हजारांपेक्षा अधिक नाणी या प्रदर्शनात होती असे राकेश शहाणे यांनी सांगितले.

## ड्रीमे टेक्नॉलॉजीने भारतात एच१२ ड्युअल फ्लेक्सरीच वेट अँड ड्राय व्हॅक्यूम सादर केला आहे, जो शक्तिशाली स्वच्छतेसह बहुपयोगी ६-इन-१ कार्यक्षमता देतो.

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

स्मार्ट होम इनोव्हेशनमधील जागतिक अग्रणी असलेल्या ड्रीमे टेक्नॉलॉजीने आज भारतात बहुपयोगी ६-इन-१ ड्रीमे एच१२ ड्युअल फ्लेक्सरीचा (FlexReach) वेट अँड ड्राय व्हॅक्यूम सादर करण्याची घोषणा केली, ज्यामध्ये शक्तिशाली स्वच्छता कार्यक्षमता, बहुपयोगी वैशिष्ट्ये आणि प्रगत स्वच्छता तंत्रज्ञान यांचा संगम आहे. रोजची घरगुती स्वच्छता सोपी करण्यासाठी डिझाइन केलेला, नवीन वेट अँड ड्राय व्हॅक्यूम १ सप्टेंबरपासून ॲमेझॉनवर, तसेच ड्रीमे इंडियाच्या अधिकृत वेबसाइट, क्रोमा (Croma) आणि निवडक रिटेल स्टोअर्समध्ये ४४,९९९ रुपयांमध्ये उपलब्ध होईल. ड्रीमे एच१२ ड्युअल फ्लेक्सरीच वेट अँड ड्राय व्हॅक्यूमच्या केंद्रस्थानी त्याची बहुपयोगी ६-इन-१ स्वच्छता क्षमता आहे, जी विविध पृष्ठभागांवरील दैनंदिन स्वच्छतेच्या अनेक गरजा पूर्ण करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. कठीण फरशी धुण्यापासून आणि व्हॅक्यूम करण्यापासून ते कार्पेट, सोफा, पडदे, कीबोर्ड आणि कारच्या आतील भाग स्वच्छ करण्यापर्यंत, हे उपकरण अधिक लवचिकतेसाठी शक्तिशाली कार्यक्षमतेसह बदलता येण्याजोग्या अटॅचमेंट्सचा मेळ घालते. त्याच्या १८०° पूर्णपणे सपाट होणाऱ्या डिझाइनमुळे ते कमी उंचीच्या फर्निचरखाली पोहोचू शकते, तर २३,००० पास्कल (Pa) सक्शन, टँगलकट™ (TangleCut™) रेझिलिएंट स्क्रॅपर आणि काढता येण्याजोगी बॅटरी त्याची साफसफाईची कार्यक्षमता आणि सोय आणखी वाढवतात. ९०° सेल्सिअस हॉट-वॉश सेल्फ-क्लीनिंग सिस्टीममुळे देखभाल सोपी होते, ज्यामुळे एच१२ ड्युअल फ्लेक्सरीच रोजच्या घरगुती स्वच्छतेसाठी एक बहुपयोगी उपाय ठरतो.




ड्रीमे टेक्नॉलॉजी इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक, मनू शर्मा म्हणाले, "भारतीय कुटुंबे दैनंदिन स्वच्छतेचे व्यवस्थापन करण्यासाठी अधिकाधिक स्मार्ट आणि सोयीस्कर मार्गांचा शोध घेत असल्याने, स्वच्छतेच्या विविध गरजांशी जुळवून घेऊ शकणाऱ्या उपायांची अपेक्षा वाढत आहे. ड्रीमे एच१२ ड्युअल फ्लेक्सरीचच्या लाँचसोबत, ग्राहकांना अधिक तात्काळ आणि लक्ष्यित स्वच्छतेच्या गरजांसाठी अधिक लवचिकता आणि नियंत्रण देण्यावर आमचा भर आहे. यामुळे वापरकर्त्यांना कमी श्रमात, विविध भागांतील आणि पृष्ठभागांवरील रोजचा पसारा अधिक सहजतेने साफ करता येतो. हे उपकरण आधुनिक भारतीय कुटुंबांच्या विविध जीवनशैलीला पूरक ठरतील अशा, व्यावहारिक आणि बुद्धिमान गृह-स्वच्छता उपाययोजना विकसित करण्याच्या ड्रीमेच्या कटिबद्धतेचे प्रतिबिंब आहे."

६-इन-१ बहुउपयोगी स्वच्छता: ड्रीमे एच१२ ड्युअल फ्लेक्सरीच ओल्या आणि कोरड्या व्हॅक्यूमिंगला अनेक बदलता येणाऱ्या अटॅचमेंट्ससोबत जोडते, ज्यामुळे घराच्या वेगवेगळ्या भागांसाठी स्वच्छतेचा एक बहुउपयोगी उपाय मिळतो. फरशी धुण्यापासून आणि व्हॅक्यूम करण्यापासून ते कार्पेट, सोफा, पडदे, कीबोर्ड आणि कारच्या आतील भाग स्वच्छ करण्यापर्यंत, हे उपकरण दैनंदिन स्वच्छतेच्या विविध गरजा हाताळण्यासाठी तयार करण्यात आले आहे.

२३,००० पास्कल (Pa) चे शक्तिशाली सक्शन: २३,००० पास्कलच्या सक्शनने सुसज्ज असलेले एच१२ ड्युअल फ्लेक्सरीच, ओल्या आणि सुक्या दोन्ही प्रकारच्या घाणीचा सहजपणे सामना करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे. हे उपकरण रोजची धूळ आणि कचरा उचलण्यासोबतच अन्नाचे कण, कॉफीचे दाणे, सांडलेले पदार्थ आणि स्वयंपाकघरातील तेलकटपणा यांसारखी अधिक कठीण घाण देखील स्वच्छ करते, ज्यामुळे विविध पृष्ठभागांची अधिक सखोल स्वच्छता होण्यास मदत होते. १८०° लाय-फ्लॅट क्लीनिंग: हे उपकरण १८०° पर्यंत झुकू शकते, ज्यामुळे ते पलंग, सोफा आणि इतर कमी उंचीच्या फर्निचरच्या खाली सहजपणे पोहोचू शकते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः गावं मौजे पिंपळवंडी, तालुका जुन्नर, जि. पुणे व परिसरातील लोकांस आमचे आशिल श्री. अमोल बबन लेंडे, रा. लेंडेस्थळ पिंपळवंडी, तालुका जुन्नर, जि. पुणे हल्ली रा. फ्लॅट क. ४०५ ॲड्रियाटिका को ऑ हौसिंग सोसायटी, कासा रियो पालवासिटी, निळजे कल्याण शिळ रोड, डोंबीवली, (पुर्व) ठाणे मुंबई ४२१ २०४ यांनी प्रत्यक्ष सांगितल्यावरून व दिलेल्या माहिती प्रमाणे जाहीर रित्या कळविण्यात येते ते येणेप्रमाणे,

खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती आमचे आशिलांचे हिंदु एकत्र कुटुंवाचे वडिलोपार्जीत मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताब्यातील मिळकती आहेत. सदर मिळकतींचे अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही असे असताना सदरहु मिळकतींबाबत कुटुंबास कुठल्याही प्रकारची कायदेशीर व नैसर्गिक अडचण नसताना आमचे आशिलांचे वडील श्री. बबन आबाजी लेंडे रा. लेंडेस्थळ पिंपळवंडी, तालुका जुन्नर, जि. पुणे हे त्यांचे नातेवाईक व इतर लोकांचे बदसल्ल्याने सदर मिळकतींचे संदर्भात स्वतःचे लाभात काही बिनताब्याचे व अनाधिकाराचे दस्त अस्तित्वात आणण्याचे जोरदार प्रयत्नात असल्याचे आमचे आशिलांस नुकतेच समजले. तसेच खाली वर्णनः केलेल्या मिळकतींचे अन्यत्र हस्तांतर करण्याचे जोरदार प्रयत्नात असल्याबाबतही आमचे आशिलांस आढळुन आले आहे. एवढेच नव्हे तर सदर मिळतींचे ७/१२ उताऱ्याचे मालक सदरी असलेल्या स्वत:चे नावाचा गैरफायदा घेवुन सदर मिळकती विकी करण्याचा प्रयत्न करतील. त्याचप्रमाणे आमचे आशिलांचे वडील आमचे आशिलांचे परस्पर संमतिविना खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींसंदर्भात एखादा तथाकथीत दस्त अस्तित्वात आणुन सदर तथाकथीत दस्ताचे व्यवहाराचे अनुषंगाने आमच्या आशिलांची व आमचे आशिलांचे कुटुंवातील लोकांची फसवणुक करण्याच्याही अक्षाघ्य प्रयत्नात असल्याचे आमचे आशिलांस समजले वरील सर्व बाबींकरिता आमचे आशिल आमचे आशिलांचे वडील श्री. बबन आबाजी लेंडे यांचेविरूध्द योग्य ती दिवाणी व जरूर तर फौजदारी स्वरूपाची कारवाई करतील. तसेच श्री. बबन आबाजी लेंडे यांचे नावे यशवंत सहकारी पतसंस्था मर्या. शाखा पिंपळवंडी तसेच पी. डी. सी. सी. बैंक शाखा पिंपळवंडी तसेच शरद सहकारी बँक मंचर शाखा नारायणगावं या ठिकाणी मुदत ठेवीच्या पावत्या असुन सदर पावत्यांवरील कोणतीही रक्कम श्री. बबन आबाजी लेंडे यांना देण्यात येवु नये.

तरी सर्व लोकांस अशी समज देण्यात येते की, खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींच्या संदर्भात श्री. बबन आबाजी लेंडे रा. लेंडेस्थळ पिंपळवंडी, तालुका जुन्नर, जि. पुणे यांचेबरोबर कोणीही खरेदी-विक्री, दान, गहान, लिज, वक्षिस, अगर अन्य कुठल्याही प्रकारे तबदिलीचा व्यवहार करू नये.

तद्वत सदरहु इसमास खाली वर्णन केलेल्या मिळकतीवर कुठल्याही प्रकारचा पतपुरवठा करू नये व त्या अनुशंगाने करार मदार करू नये. अन्यथा तसले कुठलेही व्यवहार करार मदार आमचे आशिलांचे खाली वर्णन केलेल्या मिळकती मधील मालकीवर व ताब्यावर बंधनकारक राहणार नाहीत व संबंधीत व्यक्तीस मिळकतीची मालकी व ताबा मिळणार नाही ह्याची नोंद घ्यावी.

कुणाचीही फसवणुक होवु नये म्हणुन आगावु सदरची नोटीस प्रसिद्धिस दिली असे.

परिशिष्ट

अ. मिळकतींचे वर्णन तुकडी पुणे पो. तु. पुणे व जुन्नर येथील में दुय्यम निबंधक सो. नारायणगावं यांचे हद्दीतील तसेच जिल्हा परिषद पुणे पंचायत समिती पिंपळवंडीचे हद्दीतील ग्रामपंचायत पिंपळवंडीचे हददीतील मिळकती.

| अ. नं. | ग. नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १. | १६९/१/अ | ०.२३ | ०.४६ |
| २. | १६९/१/क | ०.०७ | ०.०६ |
| ३. | १७३/१/ब | ०.४३ | २.३८ |
| ४. | १७३/१/क | ०.९६ | ४.०० |
| ५. | १७३/१/अ | ०.४३ | २.३७ |

ब. मिळकतींचे वर्णन तुकडी पुणे पो तु. जुन्नर व जुन्नर येथील मे दुय्यम निबंधक सो. जुन्नर यांचे हद्दीतील तसेच जिल्हा परिषद पुणे पंचायत समिती आगरचे हददीतील ग्रामपंचायत आगरचे हददीतील मिळकती.

| अ. नं. | ग. नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १. | ५३/३ब | ०.११ | ०.२२ |

येणेप्रमाणे मिळकती व त्यातील झाडझरोडा, लाकुडफाटा, माती, दगड धोंडा, जलतरंग वस्तुसहीत तसेच सदर मिळकतींमध्ये सर्व प्रकारचे वहीवाटीचे हक्क, जाण्यायेण्याचे हक्क व अधिकारासहीत तसेच कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार राखुन न ठेवता दरोबस्त.

क. मिळकतीचे वर्णन : तु. व. जि. पुणे पो.त. ता. जुन्नर जि. पुणे येथील मे. सब रजि. सो. नारायणगावं यांचे हद्दीतील व जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती जुन्नर यांचे हद्दीतील गावं मौजे पिंपळवंडी ता. जुन्नर जि. पुणे येथील वडीलोपार्जीत हिंदु कुटुंबाचे मालकी वहीवाटीचे व आजरोजी प्रत्यक्षात ताबेवहीवाटीस असलेले व कायदेशिर स्वामीत्व असलेल्या घर मिळकती.

| 1) ग्रा.मि.नं. | मिळकतीचे वर्णन |
|---|---|
| I) ०९४८ (वार्ड क. २) | २५X१५ मापाचे इतर पक्के घर दगड विटांचे चुना किंवा सिमेंट बांधकाम उत्तर मुखी सिमेंट पत्रा |
| II) ग्रा.मि.नं. ०७१४ (गावठाणं) | २०x१० मापाचे आर. सी सी पध्दतीचे बांधकाम उत्तर मुखी व दक्षिण मुखी |
| III) ग्रा.मि.नं. १०१६ (वार्ड क्र. २) | ५०X३० मापाचे आर. सी. सी. पध्दतीचे बांधकाम उत्तरमुखी दुमजली स्लॅप लगत व १२X१७ व १२X१७चे दगड वीट सिमेंट बांधकाम शौचालयासह |

येणेप्रमाणे वर्णनाच्या चर्तुःसिमापुर्वक घर मिळकती विदयुत कनेक्शन, विदयत मिटर, लाईट फिटींग फर्निचर, नळ कनेक्शन जीन्याने जाणे येणेचे हक्कांसह सामाईकातील पाणी व जागा वापरण्याचे तसेच जाणेयेणेचे व वहीवाटीचे सर्व हक्क व अधिकारांसह.

सही/-
रत्ना रामचंद्र हांडे (ॲडव्होकेट)
रा. विघ्नहरनगर ओझर,
ता. जुन्नर, जि. पुणे
मो. ९८६०४४० ४६५/९३२२८३१११२

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
दिनांक : २९.०८.२०२६

## AM/NS इंडिया आणि ICAR-IARI चा संयुक्त पुढाकार

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (AM/NS इंडिया) आणि भारतीय कृषी संशोधन परिषद – भारतीय कृषी संशोधन संस्था (ICAR-IARI) यांनी आज शेतीमध्ये लोह खनिज प्रक्रिया टाकाऊ घटकांच्या (IOTs) शाश्वत वापराबाबत प्रगत संशोधन करण्यासाठी सामंजस्य करारावर (MoU) स्वाक्षरी केली, भारतामध्ये चक्राकार अर्थव्यवस्था आणि साधनसंपत्तीच्या संरक्षणाच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. या सामंजस्य करारावर (MoU) AM/NS इंडियाचे संशोधन आणि विकास प्रमुख डॉ. विश्वनाथन एन. आणि ICAR-IARI चे सहसंचालक (संशोधन) डॉ. सी. विश्वनाथन यांनी स्वाक्षरी करून अदलाबदल केली, याप्रसंगी ICAR-IARI



चे प्रमुख शास्त्रज्ञ आणि मुख्य संशोधक डॉ. भूपिंदर सिंग आणि दोन्ही संस्थांचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. हे सहकार्य 2024 मध्ये AM/NS इंडिया आणि ICAR-IARI यांच्यात शेतीमध्ये लोह खनिज प्रक्रिया टाकाऊ घटकांच्या योग्यतेचा शोध घेण्यासाठी सुरू झालेल्या उत्साहवर्धक प्राथमिक अभ्यासावर आधारित आहे, कारण लोह खनिजाच्या शुद्धीकरणादरम्यान तयार होणाऱ्या या लोह खनिज प्रक्रिया टाकाऊ घटकांमध्ये सिलिका, आयर्न ऑक्साईड, ॲल्युमिना, कॅल्शियम आणि मॅग्नेशियम यांसारखी नैसर्गिक खनिजे आणि इतर सूक्ष्म व उपयुक्त पोषक तत्त्वे आढळली होती, ज्यांचा वापर पिकांच्या उत्पादनासाठी आणि जमिनीचे आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी केला जाऊ शकतो. ICAR-IARI, नवी दिल्ली आणि AM/NS इंडियाच्या किरंदुल, छत्तीसगड येथील शुद्धीकरण केंद्राजवळ घेतलेल्या प्राथमिक प्रयोगशाळा आणि शेतातील अभ्यासातून आशादायक निकाल समोर आले आहेत. या संशोधनातून असे दिसून आले आहे की धान, गहू आणि भाज्यांसह इतर पिकांसाठी आवश्यक आणि उपयुक्त खनिज पोषक तत्त्वांचा स्रोत म्हणून लोह खनिज प्रक्रिया टाकाऊ घटकांचा वापर करण्याची क्षमता आहे.

महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

ई–निविदा सुचना

महावितरण तर्फे कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग कार्यालय पुणे अंतर्गत महावितरणचे विविध कार्यालय/उपकेंद्र येथील स्थापत्य दुरुस्तीची / नवीन कामे करणेसाठी महावितरणमधील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून T- 006/ 2026-27/Recall, T-043/2026-27/Recall, T-044/2026-27 ते T-045/2026-27 साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरणच्या संकेतस्थळावर (https://etender.mahadiscom.in/eatApp) दि. ०२.०९.२०२६ ते ०९.०९.२०२६ पर्यंत दुपारी १३:०० वाजे पर्यंत उपलब्ध आहेत. तसेच निविदा दि. ०९.०९.२०२६ रोजी दुपारी १५:०० वाजेपर्यत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा दि. ०९.०९.२०२६ रोजी १५:३० वाजता शक्य असल्यास उघडण्यात येतील.

निविदासंदर्भात अधिक माहितीसाठी अति. कार्यकारी अभियंता (स्था) विभाग, पुणे यांना भ्रमणध्वनी क्र. ७८७५७६७८२४ वर संपर्क साधावा. निम्नस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते की, महावितरण च्या निविदा संकेतस्थळावर आपली नोंदणी करून घ्यावी. तसेच निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुद्धी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील "Announcements" मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

PRO No. PRO/PZ/125/2026-27 स्वा/–
कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग, पुणे

Jaihind College of Engineering, Kuran
ESTD 1996
Approved by AICTE,New Delhi,Govt. of Maharashtra (DTE)
Affiliated to Savitribai Phule Pune University
Accredited by NAAC with A Grade



Late. Tatyasaheb Gunjal
Founder, JCEI

ADMISSION NOTICE


Applications are invited for admission against vacancies after CAP rounds & Institute Level Seats to First Year (UG & PG) & Direct Second Year (UG) courses for academic year 2026-27.

UG Courses
* Artificial Int.(AI) & Data Sci.
* Civil Engineering
* Computer Engineering
* Electronics & Computer Engg.
* Electronics & Telecommunication
* Mechanical Engineering

PG Courses
* Artificial Intelligence & Data Sci.
* Civil - Structural Engineering
* Computer Engineering
* VLSI Design & Embedded System
* Signal Processing
* Design Engineering

Eligibilty- As per State CET Cell, Maharashtra State & S.P. Pune University
Mo.-9766000214,9960662727,7028036201
Shri. Jitendra M. Gunjal, President
Shri. Vijay M. Gunjal, Secretary
Dr. A. B. Ubale, Principal

## थोडक्यात पण महत्वाचे



## पिंपरी-चिंचवडमधील हायमास्ट दिवे बंद

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी: शहरामध्ये नागरिकांच्या सुविधेसाठी चौकाचौकांत, सार्वजनिक ठिकाणी, बसस्थानक, उद्यान परिसरात बसण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, या ठिकाणी प्रकाश व्यवस्थेसाठी लावलेले हायमास्ट तसेच पदपथावरील दिवे अनेक ठिकाणी बंद असल्याचे चित्र दिसत आहे. तसेच, त्याच विद्युत खांबावर जाहिरातीचे फलक लटकलेले चित्र आहे. काही ठिकाणी दिवे सतत बंद-चालू होत असल्याने नागरिकांना डोळ्यांचा त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील विविध भागांमध्ये नागरिकांसाठी बाके आणि बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सायंकाळच्या वेळेत ज्येष्ठ नागरिकांसह अनेक नागरिक या ठिकाणी काही वेळ बसण्यासाठी येतात. मात्र, अनेक ठिकाणी दिवे बंद असल्याने नागरिकांना अंधारात बसावे लागत आहे. काही ठिकाणी हायमास्ट दिव्यांपैकी काही दिवे सुरू तर काही बंद असल्याचे दिसून आले आहे. विशेष म्हणजे, काही ठिकाणी दिवे पूर्णपणे बंद नसून, खराब झाल्याने 'ब्लिंक मोड'वर असल्याचे निदर्शनास येते. दिवा काही सेकंद सुरू होऊन पुन्हा बंद होणे, पुन्हा सुरू होणे, असा प्रकार सातत्याने सुरू राहत असल्याने त्या ठिकाणी बसलेल्या नागरिकांना डोळ्यांना त्रास होत असल्याच्या तक्रारी आहेत. रात्रीच्यावेळी अशा पद्धतीने प्रकाशमान होणाऱ्या परिसरात नागरिकांची गैरसोय तर होतेच, शिवाय सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होतो. सार्वजनिक ठिकाणी लाखो रुपये खर्च करून प्रकाशव्यवस्था उभारली जाते. मात्र, दिव्यांच्या देखभाल-दुरुस्तीकडे नियमित लक्ष दिले जात नसेल, तर ही व्यवस्था नागरिकांच्या उपयोगाची कशी ठरणार?, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दिवे बसवणे एवढेच प्रशासनाचे काम आहे का, की ते नियमित सुरू आहेत की नाही याची पाहणी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे?

## जुन्या भांडणाच्या रागातून तरुणाची कोयत्याने वार करून हत्या

**पिंपरी : दैनिक संध्या**

जुन्या भांडणाच्या रागातून वराळे येथील शिक्षक कॉलनी परिसरात एका तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी आठ जणांविरोधात गुन्हा दाखल केला असून सहा जणांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी (दि. 30 ऑगस्ट) रात्री दीड वाजण्याच्या सुमारास एस.डी. फोटो स्टुडिओ, शिक्षक कॉलनी, वराळे येथे ही घटना घडली. फिर्यादी सुभाष विष्णू शिंगाडे (वय 50, रा. समता कॉलनी, वराळे) यांनी तक्रार दिली आहे. मृत प्रशांत शिंगाडे हा आपल्या मित्रांसोबत चहा पिण्यासाठी थांबला असताना आरोपींनी जुन्या भांडणाच्या रागातून त्याच्यावर हल्ला केला. आरोपींनी कोयत्याने डोक्यावर, हातावर, छातीवर व पाठीवर वार केले. तसेच डोक्यात मोठे दगड मारून त्याचा खून केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी साहिल पांडुरंग समुखराव (वय 18), सुनील पांडुरंग समुखराव (वय 24), यश दीपक लोखंडे (वय 19), रोहन हनुमंत सावंत (वय 19), हेमराज गौतम सोनवणे (वय 28), रोशन साव (वय 21) तसेच दोन विधीसंघर्षित बालकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मोहिते करीत आहेत.

## ॲथलेटिक्स स्पर्धेत साई स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी

**पिंपरी : दैनिक संध्या**

रत्नागिरी येथे आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य ज्युनिअर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये भोसरी येथील साई स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन करत तीन पदकांची कमाई केली आहे. प्राची अंधारे आणि समृद्धी भोईर या दोन्ही खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत अकॅडमीचे तसेच पिंपरी-चिंचवड शहराचे नाव उज्ज्वल केले. प्राची अंधारे हिने ५००० मीटर चालणे (रेस वॉक) या प्रकारात दमदार प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले. तर समृद्धी भोईर हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत हॅपटेथलॉन मध्ये रौप्यपदक, तिहेरी उडी ट्रिपल जंप प्रकारात कांस्यपदक मिळवून दुहेरी यश संपादन केले. प्राची अंधारे आणि समृद्धी भोईर या दोन्ही खेळाडू गेली अनेक वर्षे भोसरी येथील संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंदिरानगर येथे साई स्पोर्ट्स अकॅडमीच्या माध्यमातून नियमित सराव करत आहेत. त्यांच्या या यशामागे प्रशिक्षक चंद्रशेखर कुदळे यांचे मार्गदर्शन आणि परिश्रम महत्त्वाचे ठरले आहेत. कुदळे यांनी आजवर अनेक गुणवंत खेळाडू घडविले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली या दोन्ही खेळाडूंनीही सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर राज्यस्तरीय स्पर्धेत पदकांची कमाई केली आहे. या यशाच्या जोरावर प्राची अंधारे व समृद्धी भोईर यांची ३७ व्या वेस्ट झोन ज्युनिअर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा २७ ते ३० सप्टेंबर २०२६ दरम्यान गोवा येथे होणार असून दोन्ही खेळाडू राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. त्यांच्या या यशाबद्दल क्रीडा क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून आगामी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्येही त्या उल्लेखनीय कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल यांची महापौर व आयुक्तांना कायदेशीर नोटीस

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची २ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली विशेष सर्वसाधारण सभा ही कायदेशीरदृष्ट्या अवैध असल्याचा दावा करत माजी महापौर तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी महापौर, महापालिका आयुक्त आणि नगरसचिव यांना कायदेशीर नोटीस बजावली आहे. ॲड. असीम सरोदे अँड असोसिएटेड एलएलपी यांच्या माध्यमातून ही नोटीस पाठविण्यात आली आहे. योगेश बहल यांनी दिलेल्या माहितीनुसार, २० ऑगस्ट २०२६ रोजी झालेली महापालिकेची सर्वसाधारण सभा अजेंडावरील सर्व विषयांवर चर्चा न करता १७ सप्टेंबर २०२६ पर्यंत तहकूब करण्यात आली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, २०११ मधील तरतुदींनुसार तहकूब सभा ही मूळ सभेचाच भाग मानली जाते. त्यामुळे त्या सभेतील प्रलंबित विषय १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या तहकूब सभेतच चर्चेसाठी ठेवणे बंधनकारक असल्याचे बहल यांनी नमूद केले आहे. मात्र, २० ऑगस्टच्या सभेतील प्रलंबित विषयांपैकी निवडक विषयांचा समावेश करून २ सप्टेंबर रोजी विशेष सर्वसाधारण सभा बोलावण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. २० ऑगस्टच्या विषयपत्रिकेत एकूण ३१ विषय होते, त्यापैकी १८ निवडक विषय विशेष सभेच्या अजेंड्यात समाविष्ट करण्यात आले आहेत. हे विषय वेगळ्या सभेत मंजूर करण्याचा प्रयत्न महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी व नियमांच्या विरोधात असल्याचा दावा नोटिशीत करण्यात आला आहे. एकाच विषयावर दोन वेगवेगळ्या सभांमध्ये कार्यवाही होऊ शकत नाही.

# बेरोजगारी, आरोग्य, शिक्षणासाठी समाजाने एकी दाखवावी : विजय चौगुले



### वडार समाज गौरव पुरस्कारांचे वितरण

समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणारे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे माजी महापौर हनुमंतराव भोसले, अवर सचिव मंत्रालय (मुंबई) मनोहर बंदपट्टे आणि सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल मोरे यांचा 'वडार समाज गौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला.

■ **पिंपरी(दै. संध्या)**

वडार समाजात वाढत चाललेली बेरोजगारी, आरोग्याचे प्रश्न, तसेच शिक्षणातील अनास्था दूर करण्यासाठी समाजाने एकत्र येऊन प्रयत्न करणे आवश्यक आहे. वडार समाज फक्त महाराष्ट्रात एनटी संवर्गात आहे. बाजूच्या कर्नाटक राज्यात एससी संवर्गात मोडतो. त्यामुळे तिथे लाभ जास्त घेता येतात. जानेवारीमध्ये कोल्हापूर येथे होणाऱ्या मेळाव्यासाठी लाखो वडार बांधवांनी उपस्थित राहावे. या मेळाव्यात वडार समाजाच्या प्रलंबित मागण्या मान्य करून घेण्याला प्राधान्य असणार आहे, असा निर्धार 'मी वडार महाराष्ट्राचा' संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा नवी मुंबई महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते विजय चौगुले यांनी व्यक्त केला.

'मी वडार महाराष्ट्राचा' संघटनेच्या वतीने जानेवारी २०२७ मध्ये कोल्हापूर येथे वडार समाज महामेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे. या महामेळाव्याच्या पूर्वतयारीसाठी रविवारी (दि. ३० ऑगस्ट) भोसरीतील क्वालिटी सर्कल फोरम सभागृहात वडार समाज संकल्प मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात वडार समाज बांधवांना विजय चौगुले यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा नवी मुंबई महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते विजय चौगुले यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष सुरेश धोत्रे, माजी महापौर हनुमंतराव भोसले, महापौर रवी लांडगे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसेवक राहुल भोसले, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष पिंटूभाऊ जाधव, अवर सचिव मंत्रालय मुंबई राजेश अलकुटे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे स्वीय सहाय्यक यल्लाप्पा गाडीवडर, संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष संतोष मोहिते, संपर्कप्रमुख सुधीर पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रतिभा तांदळे, सहाय्यक संचालक मंत्रालय राजू धोत्रे, वडार एकता परिषदेचे प्रदेशाध्यक्ष भरत विटकर, युवक अध्यक्ष अमोल धोत्रे, साई संस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सतीश भोसले, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष रवी शिंदे, प्रदेश उपाध्यक्ष शंकर चौगुले, महिला प्रदेशाध्यक्ष सुनीता जाधव, सहायक पोलीस निरीक्षक (गुन्हे) विजय धोत्रे, वडार मजूर शिल्प प्रतिष्ठानचे श्यामराव विटकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक पुणे ग्रामीण प्रकाश पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक (गुन्हे) युवराज कलगुटकी, सामाजिक कार्यकर्ते संदिपान झोंबाडे, उद्योजक वसंत विटकर , प्रदीप पवार, लखन पाटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

विजय चौगुले म्हणाले, वडार समाजाच्या जातीच्या दाखल्यासाठी असलेली १९६१ च्या पुराव्याची अट शिथिल करावी, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेसह शासनाच्या विविध योजनांतून समाजातील कुटुंबांना पक्की घरे मिळावीत, बार्टी व आर्टीच्या धर्तीवर 'शूरवीर हरबा वडार रिसर्च अँड डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट' स्थापन करावे, बेरोजगारांना स्वयंरोजगार व लघुउद्योगासाठी वसंतराव नाईक भटक्या-विमुक्त विकास महामंडळाकडून विनाअट कर्ज उपलब्ध करून द्यावे. जसं आईवडिलांना विसरत नाही, तसं वडार समाजाला विसरू नका. वडार समाजाच्या पाठीशी उभे राहा, त्यांना ताकद द्या. समाजाला देव माना, कारण समाज आणि देव वेगळा नसतो. जिद्द मनामध्ये बाळगून संघटनेसाठी काम करावे. प्रशासकीय सेवेत यावे. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या मुलांची व्यवस्था करण्यासाठी समाजातील अनेकांनी पुढे आले तरच अधिकारी तयार होतील.

महापौर रवी लांडगे म्हणाले, की संघटना काय असते, हे या संघटनेकडे पाहून लक्षात येते. समाजाच्या अडचणी सोडविण्याच्या मागेच समाज मागे उभे राहतो. कष्ट, जिद्द, आत्मविश्वास, प्रेमापोटी समाज एक झाला आहे. समाजाच्या मागाण्यांचा सकारात्मक विचार करू. वडार समाजातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका उभी करण्यासाठी कटीबद्ध राहू. शिक्षणाला प्रोत्साहन दिले पाहिजे. तरच समाजाची प्रगती होते. भाऊसाहेब भोईर म्हणाले, की संघर्षावर मात करणारी माणसे भेटली की प्रेरणा मिळते. वडार समाज म्हणजे आत्मविश्वास, वडार समाज म्हणजे साहस, समाज भक्कम करण्यासाठी धडपड करणाऱ्याच्या पाठीशी राहा. आज वडार समाजाला आत्माचिंतन करण्याची गरज आहे. समस्यावर मात करून पुढे जायला हवे. दिशाहीन होत चाललोय का, याचा विचार करायला हवा. मला आधार देण्याचे काम सुरेश धोत्रे यांनी केले. जागेबद्दल चिंता करू नका. वडार समाजासाठी जागा मिळवून देऊ.

सुरेश धोत्रे म्हणाले, की कोल्हापूर येथे होणाऱ्या मेळाव्याची तयारी म्हणून हा संकल्प मेळावा आयोजित करण्यात आला. वडार समाजाच्या मागण्या पूर्ण झाल्या पाहिजेत. विकास करायचा असेल तर वडार समाजातील यशस्वी लोकांचा आदर्श घ्यायला हवा. जानेवारीच्या मेळाव्यात बहुसंख्येने उपस्थित राहा. वडार समाजासाठी पिंपरी चिंचवडमध्ये एखादी वास्तू उभी राहावी. यासाठी महापालिकेने भूखंड द्यावा, अशी मागणीही धोत्रे यांनी केली. हनुमंतराव भोसले म्हणाले, की आम्ही माणसं जोडण्याचे काम केले. काहीतरी करायची इच्छा असेल तर समाजाचे प्रश्न समजून घ्या, अडचणीत मदत करा. सामाजिक बांधिलकी जपा. संघटना मोठी करण्यासाठी तरुणांनी पुढे यावे. अनेक संघटना एक व्हायला हव्यात.

मनोहर बंदपट्टे, सहाय्यक पोलीस निरीक्षक (गुन्हे) युवराज कलगुटकी, दिलीप कुसाळकर, सहायक पोलीस निरीक्षक (गुन्हे) विजय धोत्रे यांनीही विचार व्यक्त केले. प्रास्ताविक सागर वर्से यांनी केले. सूत्रसंचालन संदीप साकोरे यांनी, तर आभार प्रदीप पवार यांनी मानले.

# १६ नंबर ते बारणे कॉर्नर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करा; अन्यथा आंदोलनाचा इशारा

**पिंपरी(दै. संध्या)**

१६ नंबर ते बारणे कॉर्नर या महत्त्वाच्या मार्गाची अत्यंत दुरवस्था झाली असून संपूर्ण रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिक, वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संभाजी ब्रिगेडने दिला आहे.

या मार्गावरून दररोज हजारो वाहनांची ये-जा होत असतानाही प्रशासनाकडून रस्त्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संभाजी ब्रिगेडने केला आहे. खड्ड्यांमुळे वाहनांचे नुकसान होत असून दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका वाढला आहे. अनेक ठिकाणी रस्ता खचल्याने चेंबर वर आले असून त्यामुळे वाहतुकीस गंभीर धोका निर्माण झाला आहे.

संभाजी ब्रिगेडचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधत रस्त्याची तातडीने पाहणी करून सर्व खड्डे बुजवावेत आणि कायमस्वरूपी दर्जेदार डांबरीकरण करावे, अशी मागणी केली आहे. रस्त्याची दुरवस्था ही केवळ गैरसोयीची बाब नसून नागरिकांच्या जीविताशी संबंधित गंभीर प्रश्न असल्याचे त्यांनी नमूद केले. "नागरिक कर भरत असताना त्यांना खड्डेमय रस्त्यांवरून प्रवास करावा लागत असेल, तर प्रशासन नेमके कोणासाठी काम करते?" असा सवालही त्यांनी उपस्थित केला. तसेच निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या ठेकेदारांवर आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

नागरिकांच्या वारंवार तक्रारीनंतरही प्रशासनाने या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यास संभाजी ब्रिगेडच्या वतीने महानगरपालिका कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही सतीश काळे यांनी दिला आहे.





# पिंपरी-चिंचवडमध्ये स्वाइन फ्लूचा विळखा

■ **पिंपरी(दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरात स्वाइन फ्लू (एच१ एन१) चा प्रादुर्भाव वाढत असून, आता पुन्हा महिनाखेरीस आणखी ४ नवे रुग्ण आढळून आले आहेत. यामुळे रुग्णसंख्या 23 वर पोहोचली आहे, अशी माहिती महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने दिली आहे. गेल्या आठवड्यामध्ये २५ ऑगस्ट रोजी स्वाईन फ्लूचे १९ रुग्ण आढळल्याची माहिती वैद्यकीय विभागाने दिली होती. त्यानंतर आता पुन्हा महिनाअखेरीस ४ रुग्ण आढळले आहेत. तसेच जुलै महिन्यातदेखील स्वाईन फ्लूचे ५ रुग्ण आढळले होते. दरम्यान, हवामानातील बदल आणि सततच्या पावसामुळे एच१ एन१ विषाणूचा संसर्ग वाढत असल्याचे डॉक्टरांचे मत आहे. ताप, खोकला, घसादुखी अशी लक्षणे आढळल्यास तात्काळ जवळच्या महापालिका दवाखान्यात तपासणी करावी, ताप, सर्दी, खोकला, घसादुखी किंवा श्वसनाशी संबंधित लक्षणे आढळल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता तातडीने वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. स्वाईन फ्लू हा श्वसनसंस्थेशी संबंधित आजार असून सर्दी, खोकला, घसादुखी, ताप तसेच श्वसनाशी संबंधित विविध लक्षणे आढळू शकतात. वातावरणातील बदलाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आपल्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पदपथ गायब

■ **पिंपरी(दै. संध्या)**

शहराच्या रस्त्यांवर वाहनांची संख्या वाढत असताना पादचाऱ्यांसाठी असलेले पदपथ मात्र, दिवसेंदिवस गायब होत चालल्याचे चित्र अनेक भागांत पाहायला मिळत आहे. एका बाजूला व्यावसायिकांकडून पदपथाचा व्यवसायासाठी तसेच पार्किंगसाठी वापर केला जात आहे, तर, दुसऱ्या बाजूला दुचाकीस्वारांकडून थेट पदपथावरून वाहने चालवली जात आहेत. त्यामुळे अखेर पादचाऱ्यांनी चालायचे तरी कुठून?, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांवर पदपथ नागरिकांसाठी मोकळे असणे अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्षात दुकानांचे फलक, साहित्य, विक्रीसाठी ठेवलेल्या वस्तू, पार्किंग आणि विविध व्यावसायिक वापरामुळे पदपथाचा मोठा भाग व्यापलेला दिसतो.

काही ठिकाणी तर पदपथ आणि दुकान यांच्यातील सीमारेषाच उरलेली नाही. यात भर पडते ती दुचाकीस्वारांच्या पदपथावरील वाहतुकीची. सिग्नलवर वाहतूककोंडी झाली की काही दुचाकीस्वार थेट पदपथाचा मार्ग पकडतात. पादचाऱ्यांसाठी राखीव असलेल्या जागेतून वाहने सुसाट जात असल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून बाजूला व्हावे लागते.

# पिंपरी-चिंचवडमध्ये दुर्घटनाग्रस्त कामगारांच्या वारसांना मदतीत भेदभाव?

■ **चिंचवड (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरात एखाद्या दुर्घटनेत कामगाराचा तसेच, नागरिकाचा मृत्यू झाल्यानंतर कुटुंबप्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळणाऱ्या पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून त्यांच्या वारसांना योग्य प्रमाणात आर्थिक मदत दिली जाणे अपेक्षित आहे; मात्र महापालिकेचे त्यासंदर्भात कोणतेही धोरण नसल्याने घडलेल्या दुर्घटना किंवा अपघाताचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित कामगारांच्या वारसांना आर्थिक मदत देऊ केली जाते.

मात्र, शहरातील अनेक कामगारांच्या वाट्याला कोणतीही आर्थिक मदत पोहचत नाही. त्या कामगारांनाही न्याय हवा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शहर 181 चौरस किलोमीटर क्षेत्रफळात विस्तारलेले आहे. शहरात चारी बाजूने लोकवस्ती वाढत असल्याने लोकसंख्या फुगत चालली आहे. तसेच, शहरात औद्योगिक भागही मोठ्या प्रमाणात आहे. आग, होर्डिंग कोसळणे, बांधकाम पडणे, पाण्यात बुडणे, इमारतीवरून पडणे, अडकून पडणे, कुत्र्यांचा चावा या सह वेगवेगळ्या दुर्घटना शहरात सातत्याने घडत आहेत. तसेच, वाहन व रस्ते अपघात, कंपनी, वर्कशॉप, गोदाममधील दुर्घटना वारंवार होत आहेत. शहरात अशा दुर्घटना किंवा अपघात घडल्यास त्या बळी गेलेल्या नागरिक किंवा कामगारांच्या वारसांना महापालिकेकडून आर्थिक मदत दिली जावी, अशी अपेक्षा केली जात आहे.

त्याबाबत विविध कामगार संघटना, संस्था, राजकीय पक्ष, नगरसेवकांसह लोकप्रतिनिधींकडून आग्रह धरला जात आहे. मात्र, महापालिकेकडून घडलेली घटना, त्यांचे गांभीर्य आणि लोकप्रतिनिधींचा दबाव लक्षात घेऊन आर्थिक मदत केली जाते. अनेक



प्रकारात मृत कामगारांच्या वारसांना कोणतीच मदत दिली जात नाही. ही बाब श्रीमंत म्हणून नावलौकीक असलेल्या महापालिकेस शोभत नाही.

शहरात दुर्घटना आणि अपघात मृत झालेल्या कामगार तसेच, नागरिकांना आर्थिक साह्य केले जावे, अशी मागणी केली जात आहे. वादळी वाऱ्यामुळे रावेत-किवळे येथे जाहिरात होर्डिंग कोसळून पाच मजुरांचा मृत्यू झाला. तर, तीन जण जखमी झाले. ती घटना 17 एप्रिल 2023 ला घडली होती. तळवडे येथे स्पार्कल फायर कॅण्डल बनवणाऱ्या कारखान्यात स्फोट होऊन लागलेल्या आगीत 14 महिला कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. ती घटना 8 डिसेंबर 2023 ला घडली होती. महापालिकेच्या कासारवाडी येथील ह क्षेत्रीय कार्यालय इमारतीवरील विद्युत रोषणाईच्या माळा काढताना खाली पडून 18 ऑगस्ट 2026 ला एका कामगाराचा जागीच मृत्यू झाला. चिंचवड येथील बीएसएनएलच्या केबल डक्टमध्ये गुदमरून दोन कर्मचाऱ्यांचा 27 ऑगस्ट 2026 ला मृत्यू झाला. त्या ठिकाणी गेल्या वर्षी 15 ऑगस्टला तीन कर्मचाऱ्यांचा गुदमरून मृत्यू झाला होता. अशा प्रकारे शहरात वर्षभरात अनेक दुर्घटना व अघपात घडतात.

मात्र, महापालिकेकडून दुर्घटनेतील प्रत्येक कामगारांच्या वारसांना आर्थिक मदत दिली जात नसल्याचे धक्कादायक चित्र आहे. जखमींना मोफत वैद्यकीय उपचार दिले गेल्याचे दिसून आले आहे. मृत्यूनंतरही कामगारनगरीत महापालिकेकडून कामगारांबाबत भेदभाव केला जात असल्याचे भेदक वास्तव आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जिल्हा परिषदेच्या शाळांना सर्वतोपरी मदत करणार : अर्चनाताई कटके

पुरंदर: दैनिक संध्या

प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज असते. या विद्यार्थ्यांना शिक्षकांनी गुणवत्तापूर्ण अध्यापन करावे. ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्या अडचणी सोडवण्यासाठी सदैव कटिबद्ध आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांना सर्वतोपरी मदत करणार असे प्रतिपादन पुरंदर पंचायत समितीच्या सदस्या सौ.अर्चनाताई ज्ञानेश्वर कटके यांनी केले. जि.प. प्राथमिक शाळा पठारवाडी येथे केंद्रस्तरीय शिक्षण परिषद संपन्न पार पडली. उद्घाटन प्रसंगी सौ. अर्चनाताई कटके बोलत होत्या. केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेला चांबळी केंद्राच्या केंद्रप्रमुख दीपश्री वाणी , शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जयश्री चौधरी, उद्योजक शेखर पिसे, मोहन चौधरी, उमेश मांढरे,प्रसाद घाटे , विजय घाटे, विठ्ठलशेठ चौधरी, सुरज घाटे, विशेष शिक्षक दीपक पाटील आदींसह चांबळी केंद्रातील शिक्षकवृंद उपस्थित होते. यावेळी पंचायत समिती सदस्या सौ. अर्चनाताई कटके यांच्याकडून शाळेला वॉटर फिल्टर, उद्योजक शेखर पिसे व मोहन चौधरी यांच्या कडून पाण्याची टाकी , शैक्षणिक साहित्य , सुरज घाटे यांच्याकडून संगणक व उमेश मांढरे यांच्याकडून फळझाडे भेट देण्यात आली अशी माहिती उद्योजक विठ्ठलशेठ चौधरी यांनी दिली. केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेमध्ये जयश्री गजधने व सुवासिनी चव्हाण यांनी तज्ञ मार्गदर्शक म्हणून शैक्षणिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक सुनील गाडे यांनी केले. आभार सहशिक्षक रोहिदास तांदळे यांनी मानले.

### जेजुरीजवळ एसटीत चोरी

जेजुरी : दैनिक संध्या

वल्लभनगरहून पंढरपूरकडे जाणाऱ्या एसटी बसमधील प्रवासी महिलेच्या बॅगेतून ५ लाख ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची घटना घडली. याप्रकरणी जेजुरी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, देहूरोड परिसरातील मनिषा बापूसाहेब पाटील वय 51 आपल्या सुनेसह बुधवारी (दि. २६) कौटुंबिक कार्यक्रमासाठी कासेगाव येथे निघाली होती. दुपारी बाराच्या सुमारास जेजुरी पोलिस स्टेशन हद्दीतील साकुर्डे गावच्या हद्दीतील हॉटेल आईसाहेबसमोर एसटी बस जेवणासाठी थांबली. त्या वेळी महिला आणि त्यांची सून चहासाठी बसमधून खाली उतरल्या होत्या. कासेगाव येथे पोहोचल्यानंतर बॅग तपासली असता त्यामधील पाच तोळ्यांचे सोन्याचे गंठण, ४३ ग्रॅम वजनाचे गंठण आणि १९ ग्रॅम वजनाचा नेकलेस आढळून आला नाही. चोरीला गेलेल्या दागिन्यांची एकूण किंमत ५ लाख ६० हजार रुपये असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. महिलेने सुरुवातीला पंढरपूर पोलीस ठाण्यात संपर्क साधला. घटना जेजुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्यांनी जेजुरी पोलिसांकडे तक्रार दिली. अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### प्रशांत खेडेकर यांची महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय संचालकपदी नियुक्ती

कवठे येमाई: दैनिक संध्या

गुरोळी (ता.पुरंदर) गावच्या विकासाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे माननीय प्रशांत संगिता कैलास खेडेकर (उपजिल्हाधिकारी) यांची महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या संचालकपदी (Director of Cultural Affairs) नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे संपूर्ण परिसरात आणि सांस्कृतिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले आहे.प्रशांत खेडेकर यांनी गुरोळी गावाचा कायापालट करण्यात आणि गावाला विकासाच्या पथावर नेण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या याच दूरदृष्टीची आणि कामाची दखल घेऊन राज्य शासनाने त्यांच्यावर ही मोठी जबाबदारी सोपवली आहे. महाराष्ट्राचा समृद्ध सांस्कृतिक वारसा जपणे, लोककलांना राजाश्रय मिळवून देणे आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांना गती देणे, यामध्ये खेडेकर यांच्या अनुभवाचा मोठा फायदा राज्याला होणार आहे. या नियुक्तीबद्दल बोलताना प्रशांत खेडेकर यांनी राज्य शासनाचे आभार मानले असून, "महाराष्ट्राची संस्कृती अधिक समृद्ध करण्यासाठी आणि तळागाळातील कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध राहीन," असा विश्वास व्यक्त केला. त्यांच्या या यशाबद्दल गुरोळी ग्रामस्थ, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि लोकप्रतिनिधींकडून त्यांच्यावर कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### दिवे येथे वनभोजनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

पुरंदर : दैनिक संध्या

दिवे (ता. पुरंदर) येथील ग्रामस्थांनी अनेक वर्षाची परंपरा जपत यंदाही वनभोजनाचा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा केला. पहाटे ग्रामदैवत श्री कातोबानाथ महाराज मंदिरात पुजारी स्वप्निल दिवेकर, दिगंबर दिवेकर व विजय दिवेकर यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. महापूजेनंतर देवांना पोषाख परिधान करण्यात आला. फुलांची सजावट करण्यात आली त्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. दिवसभर दर्शनासाठी ग्रामस्थ व भाविकांची मोठी गर्दी झाली होती. दुपारी २ वा. श्री कातोबानाथ महाराजांच्या पालखीचे माळावर जाण्यासाठी प्रस्थान झाले. यावेळी ढोलाच्या ठेक्यावर ग्रामस्थांनी "कातोबा नाथांचे चांगभलं जय घोषात गुलालाची मुक्तपणे उधळण करत गजनृत्य सादर केले. यंदाच्या पालखीचा मान समस्त झेंडे मंडळ बारुके भावकीकडे होता. महिलांनी पालखीच्या खांदेकऱ्यांना मानाचे हेल घालण्यासाठी मोठी गर्दी केली होती. लहान मुलांचा ओलांडा झाल्यानंतर टिळेकर आळीमार्गे पालखी माळावर पोहोचली. मार्गावर महिलांनी आकर्षक रांगोळ्या काढून पालखीचे ठिकठिकाणी उत्साहात स्वागत केले. दिवे गावच्या वनभोजनाला धार्मिक व सामाजिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. नोकरी व व्यवसायानिमित्त ग्रामस्थ बाहेरगावी असले तरी या पारंपरिक उत्सवासाठी आवर्जून गावात येतात. माळावर दिवे गावासह परिसरातील बारा वाड्यांमधील भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. वनभोजनाच्या निमित्ताने युवकांसाठी कबड्डीच्या सामन्याचे आयोजन करण्यात आले. अ संघ व ब संघ अशी विभागणी करून झालेल्या सामन्यात युवकांनी आपले वय विसरून कबड्डीचा मनमुराद आनंद लुटला. यामध्ये ब संघाने अ संघावर मात करत विजय मिळविला. पालखीसमोर ह.भ.प. गितांजली महाराज झेंडे-कुलकर्णी यांचे कीर्तन झाले. गावातील भजनी मंडळाने त्यांना साथ दिली.

यावेळी ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. बालगोपाळांनी पतंग उडविण्याचा आनंद लुटला. काही मुलांनी स्वतः तयार केलेल्या आकर्षक वावड्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. संध्याकाळी पालखीची जालिंदरनाथ महाराज मंदिरात भेट झाली. त्यानंतर पालखी गावच्या वेशीवर विसावली. रात्री पुन्हा वाजत गाजत पालखी श्री कातोबानाथ महाराज मंदिरात जाऊन विसावली असे माजी सरपंच गुलाबतात्या झेंडे व रमेश झेंडे यांनी सांगितले. यावेळी ग्रामस्थांसह पाहुणे मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# चाकणला उद्योजकांनी मांडली उपसभापतींसमोर गाऱ्हाणी

■ चाकण (दै. संध्या)

चाकण भागातील उद्योजकांनी आपली गाऱ्हाणी महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांच्यासमोर मांडली.

भीमाशंकर दर्शनानंतर महाराष्ट्र प्रदूषण महामंडळाचे सदस्य नितीन गोरे यांच्या समवेत चाकण औद्योगिक परिसराला भेट देत एमआयडीसीतील विविध समस्यांची अहिर यांनी पाहणी केली. रस्ते, वाहतूक कोंडी, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, ड्रेनेज व पायाभूत सुविधांबाबत त्यांनी अधिकारी, उद्योजक आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून इत्यंभूत माहिती घेतली.

कोर्निंग चौक ते नाशिक रोड दरम्यान विकास कामांमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांशीही त्यांनी चर्चा केली. यावेळी ॲड. पांडुरंग केदारी, ट्रॅफिक मुक्त कृती समितीचे सल्लागार अभिमन्यू शेलार, श्रीपाद कदम, निलेश जाधव, निखिल शेवकरी, योगेश गायकवाड व निलेश सातव आदींनी शेतकऱ्यांच्या समस्या अहिर यांच्यासमोर मांडल्या. अहिर यांनी यावेळी शेतकऱ्यांना सकारात्मक उत्तरे देऊन दिलासा दिला.

बाधित शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्याचे आश्वासन अहिर यांनी यावेळी दिले. त्यांच्या पाहणीमुळे चाकण एमआयडीसीतील प्रलंबित प्रश्नांना शासन स्तरावर आवाज मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

सचिन आहिर यांनी यावेळी कॉर्निंग कंपनी जवळ जाऊन रस्त्यांची पाहणी केली. शेतकरी व कृती समिती आणि पीडब्ल्यूडीचे अधिकारी यांच्या सोबत सक्रियपणे चर्चा केली. येत्या ४ महिन्यांत या रस्त्याचे काम चालू होईल, असे आश्वासन दिले. तळेगाव चाकण रस्ता अजून ३ महिन्यांनी चालू होईल. काम आणि बाकी पायाभूत सुविधा आणि प्रामुख्यांनी पीएमआरडीए यांनी मंजूर केलेले रस्ते याबाबत सकारात्मक चर्चा केली.



## ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सुरक्षेसाठी पुण्यात मूक मोर्चा

■ नीरा (दै. संध्या)

कर्तव्य बजावत असताना ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले, धमक्या, दबाव तसेच मानसिक त्रासाच्या घटनांना आळा घालून त्यांना सुरक्षित वातावरण मिळावे, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या वतीने मंगळवार, दि. १ सप्टेंबर रोजी राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मूक मोर्चा काढण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारीही या आंदोलनात सहभागी होणार असून जिल्हा परिषद पुणे ते जिल्हाधिकारी कार्यालय पुणे असा शांततामय मूक मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पुणे जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे अध्यक्ष अमोल घोळवे आणि सरचिटणीस संदीप ठवाळ यांनी केले आहे.

जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिवरे ग्रामपंचायतीमध्ये दि. १७ ऑगस्ट रोजी नियोजित ग्रामसभा सुरू असताना जमावाकडून ग्रामपंचायत अधिकारी कै. पी. एन. पाटील यांच्यावर हल्ला झाल्याची घटना घडली. या घटनेनंतर झालेल्या मानसिक त्रासामुळे त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने राज्यातील ग्रामपंचायत अधिकारी संवर्गात संताप आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेच्या निषेधार्थ पुणे जिल्ह्यासह राज्यातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी दि. १८ ऑगस्टपासून ग्रामसभा कामकाजावर बहिष्कार टाकला असून, आंदोलनाची पुढील दिशा म्हणून १ सप्टेंबर रोजी मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, ग्रामसभेच्या कामकाजादरम्यान काही व्यक्ती प्रसिद्धीसाठी चित्रीकरण करून ते सोशल मीडियावर प्रसारित करतात. त्यामुळे ग्रामसभेतील मूळ विषय बाजूला पडून विषयांतर होते आणि कामकाजात अडथळे निर्माण होतात, असा आरोप ग्रामपंचायत अधिकारी युनियनने केला आहे. शासकीय कार्यालयांमध्ये पूर्वपरवानगीशिवाय व्हिडिओ चित्रीकरण करण्यास प्रतिबंध करावा, तसेच खोटी अथवा दिशाभूल करणारी माहिती सोशल मीडियावर प्रसारित करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही युनियनने केली आहे. ग्रामसभांची संख्या कमी करून अनावश्यक प्रशासकीय ताण कमी करावा, ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांना मानसिक, सामाजिक आणि प्रशासकीय दबावापासून संरक्षण द्यावे, धमकी, दबाव, गैरवर्तन व बदनामीपासून कायदेशीर संरक्षण मिळावे, तसेच लाभार्थी निवड गावपातळीवर न करता जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरून करण्यात यावी, अशा विविध मागण्या युनियनने केल्या आहेत. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना निर्भय वातावरणात काम करता यावे, यासाठी संबंधित अधिनियमात आवश्यक सुधारणा करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. ग्रामसभांमध्ये चित्रीकरण करून सोशल मीडियावर प्रसिद्धी करण्याचे तसेच विषयांतर करून ग्रामसभा कामकाजात अडथळे निर्माण करण्याचे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत असून, या प्रकारांना आळा घालण्यासाठी कायद्यात आवश्यक सुधारणा करणे गरजेचे असल्याचे पुणे जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे कार्याध्यक्ष पुंडलिक म्हस्के यांनी सांगितले. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आणण्यासाठी होणाऱ्या या मूक मोर्चाकडे प्रशासन कोणती भूमिका घेते आणि अधिकाऱ्यांच्या मागण्यांवर कोणता निर्णय घेतला जातो, याकडे जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## उभ्या टँकरला दुचाकीची धडक; तरुणाचा मृत्यू

■ नीरा (दै. संध्या)

पुणे-पंढरपूर पालखी महामार्गावर पिसुर्टी गावच्या हद्दीत कामठवाडी स्मशानभूमीजवळ रस्त्यावर उभ्या असलेल्या टँकरला पाठीमागून दुचाकीची धडक बसून झालेल्या अपघातात अभिजीत भगवान निगडे (वय ३८, रा. गुळुंचे, ता. पुरंदर) यांचा मृत्यू झाला. रविवारी (दि. ३०) रात्री साडेआठच्या सुमारास हा अपघात झाला. रस्त्याच्या डाव्या बाजूच्या दुचाकीच्या लेनमध्ये टँकर उभा करून ठेवण्यात आल्याने हा अपघात घडल्याचा आरोप असून, टँकर चालकाच्या निष्काळजीपणामुळे तरुणाला जीव गमवावा लागल्याची चर्चा आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिजीत निगडे हे त्यांच्या ताब्यातील दुचाकी (एमएच १२ झेड एफ १०७१) घेऊन जेजुरीकडून नीरेकडे जात होते. पिसुर्टी गावच्या हद्दीतील पाटीलवाडा हॉटेलसमोर पालखी महामार्गावर डाव्या बाजूच्या दुचाकीच्या लेनमध्ये टँकर (एमएच ११ बीएल ५८५९) उभा होता. रात्रीच्या वेळी वाहतुकीच्या मार्गात टँकर उभा करून ठेवल्याने दुचाकीस्वाराला त्याचा अंदाज न आल्याने दुचाकीची टँकरला पाठीमागून जोरदार धडक झाली.

या अपघातात अभिजीत निगडे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना उपचारासाठी नेण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. अपघातात दुचाकीचेही मोठे नुकसान झाले.

या घटनेची खबर नितीन बबनराव निगडे यांनी दिली. याप्रकरणी जेजुरी पोलिस ठाण्यात फेटल मोटर अपघात रजिस्टर क्रमांक ०९/२०२६ अन्वये नोंद करण्यात आली आहे. अपघाताची नोंद सोमवार (दि. ३१) रोजी मध्यरात्री १२ वाजून ४९ मिनिटांनी करण्यात आली. दरम्यान, महामार्गावर रात्रीच्या वेळी वाहन सुरक्षित ठिकाणी न उभे करता वाहतुकीच्या लेनमध्ये उभे केल्याने अपघाताचा धोका वाढतो.

## तुरुकवाडी येथे गोहत्या प्रकरणी ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

■ राजगुरुनगर (दै. संध्या)

खेड तालुक्यातील तुरुकवाडी (कडूस) येथे गोहत्या केल्याच्या आरोपावरून ११ जणांविरुद्ध खेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि.३१) ऑगस्ट रोजी रात्री सुमारे १२.४० वाजण्याच्या सुमारास पोलीस उपनिरीक्षक महेश गरड यांना डायल ११२ वरून मौजे तुरुकवाडी, कडूस (ता. खेड) येथे गोहत्या होत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक महेश गरड व पोलीस कर्मचारी विलास साबळे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली.

तुरुकवाडी येथील हबीब मनसुभ शेख यांच्या मालकीच्या मोकळ्या जागेत तसेच हसन चांद तुरुक यांच्या बंद घराच्या शेजारी रक्ताचे डाग व जनावराचे अवशेष आढळून आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याबाबत अधिक चौकशी केली असता काही संशयितांनी गाय कापून तिच्या मांसाचे तुकडे केल्याची माहिती समोर आली. या प्रकरणी सैफ असीफ शेख, मुक्तार गुलाब शेख, अरीफ सलीम शेख, जाकीर अब्बास शेख, असीफ महम्मद शेख, अजीज अब्दुलजलील शेख, शाकीर रज्जाक पठाण, अझाद गुलाब शेख, मुनीर मोहम्मद शेख, सद्दाम मकबुल शेख (सर्व रा. तुरुकवाडी, कडूस, ता. खेड) तसेच तोसीफ युसुफ शेख (रा. सांगवी, पुणे) अशा एकूण ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

योगीराज सुरेश करवंदे, रा. पाबळरोड राजगुरुनगर, दीपक पांडुरंग गावडे रा. राक्षेवाडी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार रविवारी (दि.३०) ऑगस्ट रोजी रात्री ११ ते ११.३० वाजण्याच्या दरम्यान संबंधितांनी धारदार हत्याराने गाय कापून तिच्या मांसाचे तुकडे केले व ते आपापसात वाटून घेतले. तसेच इतर अवशेष फेकून दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी खेड पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३२५, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमातील संबंधित कलमांन्वये खेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींना खेड न्यायालयात हजर केले असता तीन तारखेपर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

## स्व.डॉ.गिरीश ढमाले स्मृती मॅरेथॉन जल्लोषात संपन्न

■ राजगुरुनगर (दै. संध्या)

नारायणगाव - लायन्स क्लब ऑफ नारायणगाव पुरस्कृत आणि डॉ. गिरीश ढमाले स्पोर्ट्स फाउंडेशन आयोजित पहिल्या स्व.डॉ. गिरीश ढमाले स्मृती मॅरेथॉन २०२६ मोठ्या उत्साहात नारायणगाव येथे संपन्न झाली. स्व.गिरीश ढमाले यांच्या प्रतिमेचे पूजन करून राष्ट्रगीताने स्पर्धेची सुरुवात करण्यात आली.



यात स्पर्धेत एकूण ५ गटात लहान मुले, मुलींपासुन ज्येष्ठ नागरिकांपर्यंत एकूण ५२७ खेळाडूंनी सहभाग घेतला. पुणे, नाशिक, सांगली, बारामती, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील खेळाडूंनी सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. यात एकूण सहा गटात प्रत्येक गटात १० क्रमांक काढून प्रमाणपत्र, सन्मान चिन्ह, रोख रक्कम व मेडल देऊन गौरविण्यात आले. तसेच उपस्थित प्रेक्षकांना लकी ड्रॉच्या माध्यमातून आकर्षक बक्षीसे देण्यात आली.

यानिमित्ताने आरती गिरीश ढमाले, शिवसेना तालुकाप्रमुख व उपसरपंच योगेश उर्फ बाबु पाटे, उद्योजक अशोक गांधी, युवा नेते सुरज वाजगे, भागेश्वर डेरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे, पोलीस उपनिरीक्षक जगदीश पाटील, पोलीस उपनिरीक्षक स्वाती काठे/धोंगडे, गोपनीय विभागाचे दत्ता ढेंबरे, शिरीष ढमाले, लायन्स क्लब नारायणगावचे प्रोजेक्ट इन्चार्ज मनोज भळगट, राजेंद्र देसाई, अध्यक्ष वैभव मुथ्था, सचिव गिरीश मुनोत, खजिनदार हिमांशू शहा, योगेश रायकर, ला. आनंद कोठारी, डॉ.अनुष्का शिंदे, प्रा.लहू गायकवाड, प्रा. श्रीकांत फुलसुंदर, प्रा.शरद काफले यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्पर्धेसाठी असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक करत खेळाडूंना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी डॉ. गिरीश ढमाले स्पोर्ट्स फाउंडेशनचे अध्यक्ष परशुराम वारुळे, उपाध्यक्ष सचिन जुंदरे, सचिव अशफाक पटेल, सहसचिव रवी शिंदे, खजिनदार सुशांत बनकर, सहखजिनदार दादासाहेब कोठाळे, संचालक प्रशांत इचके, राजु कोऱ्हाळे, प्रा. दिलीप शिवणे यासह विक्रांत खरगे, जुबेर शेख, क्रीडा शिक्षक प्रा. उमेश पनेरू, डॉ.सुनील पानसरे सर, बबन गुळवे, एच.पी नरसुडे, भालेराव सर, सचिन काशिद, अमित झरेकर, ओंकार मेहेर, यांसह कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय नारायणगावचे प्राध्यापक, छात्रसेना विद्यार्थी, नारायणगाव पोलीस स्टेशन, ग्रामपंचायत नारायणगाव व वारूळवाडी, ढमाले सर कुटुंबीय, मित्रपरिवार व विद्यार्थी, क्रीडा शिक्षकांनी मोलाचे सहकार्य केले.

# अतिक्रमण कारवाई विरोधात बिरदवडीकर ग्रामस्थ संतप्त

■ चाकण (दै. संध्या)

सार्वजनिक बांधकाम विभागाने चाकण भागातील अतिक्रमणांवर कारवाई सुरू केली असून, या कारवाई विरोधात बिरदवडीकर ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत.

या परिसरातील ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. अंतर्गत रस्त्यांवरील बांधकामे पाडणे म्हणजे आम्हांला रस्त्यावर आणण्याचा प्रकार असून, याविरोधात आम्ही आंदोलन करणार आहे. चाकण एमआयडीसीने प्रथम त्यांचे स्वतःचे रस्ते तयार करावेत, अशी मागणी बिरदवडी ग्रामस्थांकडून होऊ लागली आहे. यावेळी माजी सरपंच बाबासाहेब पवार यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ते म्हणाले की, '३२ गावे बिरदवडी मार्गावरून ये जा करतात. एमआयडीसी विकास करेल अशी अपेक्षा होती, पण त्यांनी स्वतःचे



रस्ते तयार करायला पाहिजे होते. आमची उपजीविकेची साधने पाडून आम्हांला रस्त्यावर आणण्याचा हा प्रकार आहे. एमआयडीसीने प्रथम त्यांचा ६० मीटर रुंदीचा रस्ता तयार करावा. आम्ही या जागेचे मालक असताना आमच्यावर अन्याय करून आम्हांला रस्त्यावर आणले जात आहे.

याविरोधात आम्ही सर्वजण एकवटले असून लवकरच आंदोलन करणार आहोत." चाकण एमआयडीसीने त्यांचे रस्ते केले आणि त्यावरून वाहतूक सुरू केली, तर स्थानिक वाहतुकीसाठी हा रस्ता पुरेसा ठरेल. आम्हांला जबरदस्तीने नोटीसा दिल्या आहेत, असे त्यांनी सांगितले. बिरदवडी ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, एमआयडीसीसाठी आमच्या जमिनी देण्यात आल्या. उर्वरित जागेवर बांधलेल्या खोल्या आणि गाळ्यांमधून आम्ही उपजीविका करत आहोत. मात्र, आता एमआयडीसीच्या कारवाईमुळे हे व्यवसायही बंद होण्याची भीती आहे.

बिरदवडी ते चाकण या मार्गावर काही लोकांनाच नोटीस देऊन दुफळी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. येथील शेतकरी दशरथ काचोळे यांनी सांगितले की, एमआयडीसीच्या पाचव्या टप्प्यासाठी त्यांच्या जमिनी गेल्या आहेत. एमआयडीसीने रस्ता पूर्ण केल्यास या मार्गावरील वाहतूक कमी होईल, पण दोन्ही ठिकाणी जमिनी जात असल्याने ते बेघर होणार आहेत.

### तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा

यावेळी बिरदवडी गावचे माजी सरपंच बाबासाहेब पवार, विशाल पवार, मारुती शिळवणे, एकनाथ पवार, सुनील पवार, बाळासाहेब शिळवणे, संदीप पवार, किसन पवार, दशरथ काचोळे, तानाजी पवार, बेबीताई पवार, संगीता राक्षे, रामदास राक्षे, मोनिका पवार, रुपाबाई मुळे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, एमआयडीसीने ग्रामस्थांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.

“


कॉर्निंगचा रस्ता प्रथम पूर्ण केला पाहिजे. उड्डाणपूल किंवा इतर उपाययोजना करण्याऐवजी लोकांना बेघर करायला निघाले आहेत. आमच्यावर कारवाई न करता इतर रस्ते मार्गी लावा. प्रशासन शेतकऱ्यांच्या अंगावर येत आहे, हे सहन करणार नाही."

- बाळासाहेब शिळवणे, उद्योजक.

"सरकारच्या नियोजनशून्य कारभाराला आम्ही कंटाळलो आहोत. आमच्या जागेवर आमचे बांधकाम आहे, ते अतिक्रमण कसे असू शकते? त्यांनी आधी त्यांचा रस्ता पूर्ण करावा. आमच्या वास्तू आम्ही पाडू देणार नाहीत."




दैनिक
संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे

### नवी दिल्लीत राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

नवी दिल्ली : छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य, प्रशासन व्यवस्था आणि राष्ट्रनिर्मितीच्या विचारांसंदर्भात विविध अंगांनी चर्चा करण्यासाठी नवी दिल्लीत दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ (जेएनयू) आणि श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'जयिष्णू : सहिष्णू भारताचे रक्षक' या विषयावर 2 व 3 सप्टेंबर 2026 रोजी जेएनयूच्या कन्व्हेन्शन सेंटरमध्ये हे चर्चासत्र होणार आहे. शिवाजी महाराजांच्या इतिहासाकडे केवळ युद्ध आणि पराक्रमाच्या दृष्टिकोनातून न पाहता त्यांची प्रशासन व्यवस्था, राज्याभिषेक, दक्षिण दिग्विजय, मराठा आरमार, संस्कृत साहित्यातील शिवरायांचे संदर्भ तसेच पुढील काळातील मराठ्यांचा दिल्लीवरील प्रभाव अशा विविध पैलूंवर चर्चासत्रात तज्ज्ञांकडून विचारमंथन केले जाणार आहे. चर्चासत्राचा उद्घाटन सोहळा २ सप्टेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजता जेएनयूच्या कुलगुरू प्रा. शांतिश्री पंडित यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. तंजावर घराण्याचे प्रतिनिधी श्री बाबाजी भोसले मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक श्री प्रशांत खेडेकर विशेष अतिथी, तर प्रसिद्ध विचारवंत श्री मुकुल कानिटकर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहतील. उद्घाटनानंतर खासदार डॉ. सुधांशू त्रिवेदी 'एक हजार वर्षांचा हिंदू प्रतिकार' या विषयावर विचार मांडतील. तसेच शिवरायांचा राज्याभिषेक व प्रशासन, महाराजांची दक्षिण मोहीम आणि संस्कृत साहित्यातील शिवरायांचे संदर्भ या विषयांवर विविध तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. पहिल्या दिवसाचा समारोप कवी भूषण यांच्या काव्यावर आधारित 'शिवराज भूषण' या महानाट्याने होणार आहे. दुसऱ्या दिवशी, तीन सप्टेंबर रोजी शोधनिबंध सादरीकरणासह विविध तांत्रिक सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. यामध्ये 'मराठा आरमार', औरंगजेबाच्या वेढ्यादरम्यान मराठ्यांचा संघर्ष तसेच '18 व्या शतकातील दिल्लीवरील मराठ्यांचे वर्चस्व' या विषयांवर इतिहास संशोधक व अभ्यासक आपले विचार मांडणार आहेत. या चर्चासत्राचा समारोप ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी सव्वा चारला होणार असून, जेएनयूच्या कुलगुरू प्रा. शांतिश्री धुलिपुडी पंडित अध्यक्षस्थानी राहतील. महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार मुख्य अतिथी, तर ज्येष्ठ विचारवंत श्री प्रदीप रावत आणि प्रा. हिरामण तिवारी सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

### शासकीय योजना पोहोचविण्यात नवमाध्यमांचा प्रभावी वापर

नागपूर : जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार यांनी आपल्या सेवाकाळात शासकीय योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यात केलेला नवमाध्यमांचा वापर आणि जनसंपर्क क्षेत्रातील योगदान कौतुकास्पद आहे. शासनाची सकारात्मक प्रतिमा जनमानसात रुजविण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम आणि त्यांची कामावर असलेली निष्ठा माहिती विभागासाठी नेहमीच प्रेरणादायी राहील, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर - अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे यांनी केले. जिल्हा माहिती अधिकारी श्री. रापतवार हे नियत वयोमानानुसार आज 31 ऑगस्ट रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहामध्ये आयोजित एका बैठकीत संचालक डॉ. गणेश मुळे बोलत होते. अमरावती विभागाचे उपसंचालक अनिल आलुरकर, जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार, मंगेश वरकड, श्रीमती शैलजा दांदळे, राजेश येसनकर, श्रीमती अंजू कांबळे, गजानन जाधव, सहायक संचालक (माहिती) श्रीमती अपर्णा यावलकर, अतुल पांडे, अनिल गडेकर, अविनाश महालक्ष्मे तसेच श्री. रापतवार यांच्या पत्नी वर्षा आणि कन्या निकेता रापतवार यावेळी उपस्थित होत्या. श्री. रापतवार यांनी आपल्या कार्याप्रती नेहमी सजगता बाळगली. सर्व परिस्थितीत सकारात्मकता जोपासली. त्यामुळे ते उत्कृष्ट अधिकारी ठरले. पदे ही बिरुदावली असतात. आपली 'स्व' ओळख निर्माण करणे महत्त्वाचे आहे. श्री रापतवार यांनी आपल्या कार्यातून आपली 'स्व' ओळख निर्माण करून आपला कार्यशैलीचा ठसा उमटविला आहे. ही कार्यशैली, येथील अनुभव त्यांना निवृत्तीनंतरच्या नवीन जबाबदाऱ्यांसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास संचालक डॉ. मुळे यांनी यावेळी व्यक्त केला.

# गणेशोत्सव... परंपरेचा, आपुलकीचा आणि नव्या जाणिवांचा उत्सव

***सिंधुदुर्ग म्हटलं की डोळ्यांसमोर येतो तो निळाशार समुद्र, हिरवीगार डोंगररांग, लाल मातीची वाट, कौलारू घरे, अंगणातली तुळस आणि माणसांच्या मनात जपलेली आपुलकी. या भूमीच्या सांस्कृतिक जीवनात अनेक सण-उत्सवांना विशेष स्थान आहे; मात्र गणेशोत्सवाची गोष्ट काही वेगळीच आहे. कारण इथे गणपती म्हणजे केवळ देवघरात विराजमान होणारी मूर्ती नाही, तर घराला पुन्हा घरपण देणारा, माणसांना पुन्हा एकत्र आणणारा आणि गावाला पुन्हा जिवंत करणारा उत्सव आहे.***

श्रावण सुरू झाला की कोकणात गणेशोत्सवाची चाहूल लागते. घरांची साफसफाई सुरू होते, मखराची तयारी होते, अंगण सजते, बाजारपेठा गजबजतात आणि दूरवर नोकरी-व्यवसायासाठी गेलेल्या माणसांच्या परतीची वाट पाहिली जाते. मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई किंवा राज्याच्या इतर भागांत राहणारा कोकणवासी गणपतीसाठी आपल्या गावच्या घराकडे परततो. वर्षभर दूर असलेली भावंडे, नातेवाईक, मित्रमंडळी पुन्हा एकत्र येतात. सिंधुदुर्गाच्या गणेशोत्सवाचे हेच कदाचित सर्वांत मोठे वैशिष्ट्य आहे—बाप्पा येतो आणि माणसं जवळ येतात.

सिंधुदुर्गातील गणेशोत्सव हा म्हणूनच श्रद्धेबरोबरच कुटुंब, गाव आणि परंपरेचा उत्सव आहे. जिल्ह्यातील सांस्कृतिक परंपरांमध्ये गणेशचतुर्थीला महत्त्वाचे स्थान असून भजन, फुगड्या आणि विविध लोककला या उत्सवाशी जोडलेल्या आहेत. गावागावांत गणेशोत्सवाच्या काळात वातावरण भक्तिमय करणाऱ्या भजनांच्या तालमी आधीपासून सुरू होतात. अभंग, गौळणी, गजर आणि पारंपरिक वाद्यांचा नाद उत्सवाला वेगळीच रंगत देतो.

या परंपरेत आपल्या मातीचा सुगंध आहे. घरगुती गणपती, गौरीचे आगमन, आरती, नैवेद्य, मोदक, भजन, फुगड्या, नातेवाईकांच्या भेटीगाठी, लहान मुलांचा उत्साह, आजी-आजोबांच्या आठवणी आणि गावच्या मंडळींचे सामूहिक नियोजन—या सगळ्यांनी मिळून सिंधुदुर्गाचा गणेशोत्सव आकार घेतो. कुठे घरातील ज्येष्ठ व्यक्ती परंपरा सांगते, कुठे आई किंवा आजी मुलांना नैवेद्याची पद्धत शिकवते, तर कुठे तरुण मंडळी सजावट, आयोजन आणि डिजिटल माध्यमांची जबाबदारी सांभाळतात. अशा प्रकारे प्रत्येक पिढी आपापल्या पद्धतीने उत्सवात सहभागी होते.

राज्य शासनाच्या वतीने आता गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचे स्वरूप देण्यात आले असून त्यानिमित्त विविध सांस्कृतिक, सामाजिक, पर्यावरणपूरक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्याची संकल्पना पुढे आली आहे. उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावर स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, गणेशोत्सवाशी संबंधित रील्स व डिजिटल उपक्रम, प्रमुख गणेशस्थळांचे ऑनलाइन दर्शन आणि विविध क्षेत्रांतील स्थानिक सहभागाला प्रोत्साहन देण्याची दिशा निश्चित करण्यात आली आहे. या सगळ्या उपक्रमांचा अर्थ उत्सव मोठा, भव्य किंवा खर्चिक करणे एवढाच नाही. उलट, आपली परंपरा जपत उत्सव अधिक अर्थपूर्ण कसा करता येईल, हा त्यामागचा खरा विचार आहे.

गणेशोत्सव मंडळांनी यंदा आपल्या परिसरातील पारंपरिक कला आणि स्थानिक संस्कृतीला सजावटीचा आणि कार्यक्रमांचा केंद्रबिंदू बनवावे. सिंधुदुर्गची दशावतार लोककला, स्थानिक हस्तकला, पारंपरिक वाद्ये, कोकणी-मालवणी संस्कृती, गावचा इतिहास, स्थानिक देवस्थाने, किल्ले, लोकपरंपरा अशा विषयांवर देखावे, प्रदर्शन, कथाकथन किंवा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करता येतील. सिंधुदुर्गच्या सांस्कृतिक ओळखीत दशावताराबरोबर चित्रकथी, गंजिफा, कोळीनृत्य आणि विविध ग्रामपरंपरांना महत्त्व आहे.

मुलांसाठी गणपती म्हणजे आनंदाचा सण. त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणारा उत्सव घडविणे ही मोठ्यांची जबाबदारी आहे. शाडू मातीपासून गणेशमूर्ती बनविण्याच्या कार्यशाळा, गणेशोत्सवावरील चित्रकला, निबंध, वक्तृत्व, कथाकथन, पारंपरिक खेळ, प्रश्नमंजुषा किंवा स्थानिक इतिहासावर आधारित उपक्रम घेता येतील. तरुणांसाठी डिजिटल डिझाइन, रील्स, छायाचित्रण आणि माहितीपट निर्मितीच्या संधी उपलब्ध करून देता येतील. ज्येष्ठ नागरिकांकडून गावच्या गणेशोत्सवाच्या जुन्या आठवणी ऐकून त्या नव्या पिढीपर्यंत पोहोचविता येतील. गणेशोत्सव म्हणजे फक्त मनोरंजन नव्हे; तो पिढ्यांना जोडणारा सांस्कृतिक दुवा आहे. यंदा या दुव्याला पर्यावरणाची जोड देऊया. बाप्पाच्या स्वागतासाठी शाडू मातीची किंवा पर्यावरणपूरक मूर्ती निवडणे, प्लास्टिकचा वापर टाळणे, नैसर्गिक साहित्याने सजावट करणे, निर्माल्य वेगळे संकलित करणे आणि शक्य तिथे पर्यावरणपूरक विसर्जनाची व्यवस्था करणे, हे प्रत्येक घर आणि मंडळाला सहज शक्य आहे. फुले, पाने, नारळाच्या झावळ्या, बांबू, कापड, कागद, माती आणि स्थानिक उपलब्ध साहित्य वापरून केलेली सजावट ही दिसायलाही सुंदर असते आणि आपल्या मातीतल्या परंपरेशीही जोडलेली असते.

विसर्जन हा भावनेचा क्षण आहे. त्यामुळे तो तितक्याच जबाबदारीने साजरा करणे गरजेचे आहे. जलस्रोत स्वच्छ राहावेत, पाण्याला आणि निसर्गाला हानी पोहोचू नये, निर्माल्य पाण्यात न टाकता स्वतंत्रपणे संकलित करावे, याची काळजी घेऊया. आवश्यक त्या ठिकाणी कृत्रिम विसर्जन तलावांचा वापर करणे, हा देखील पर्यावरणपूरक पर्याय ठरू शकतो. पर्यावरणपूरक गणेशोत्सव, निर्माल्य संकलन, पुनर्वापर आणि प्लास्टिकमुक्त उत्सवासाठी व्यापक जनजागृती करण्याची दिशा यंदाच्या उपक्रमांमध्येही अधोरेखित करण्यात आली आहे.

ऊर्जेची बचत हा देखील उत्सवाचा एक सुंदर संकल्प होऊ शकतो. सजावटीसाठी दिवसभर अनावश्यक विद्युत रोषणाई ठेवण्याऐवजी गरजेपुरतीच रोषणाई, एलईडी दिव्यांचा वापर, शक्य असल्यास सौरऊर्जेवर आधारित सजावट आणि वेळेचे नियोजन यामुळे उत्सवाचा आनंद कमी होत नाही; उलट जबाबदार उत्सवाची नवी ओळख निर्माण होते. ऊर्जा बचतीचा संदेश देणारा गणेशोत्सव ही पुढच्या पिढीसाठीची चांगली शिकवण ठरेल.



उत्सव हा समाजाला जोडण्यासाठी असतो. म्हणून मंडळांच्या कार्यक्रमांमध्ये स्थानिक बचत गट, कारागीर, कलाकार, शेतकरी, लघुउद्योजक आणि स्थानिक उत्पादनांना स्थान देता येईल. गणेशमूर्ती, मखर, सजावट, पूजासाहित्य, पारंपरिक खाद्यपदार्थ, हस्तकला किंवा स्थानिक कलाकृती यांना प्रोत्साहन दिल्यास उत्सवाचा आनंद गावच्या अर्थव्यवस्थेलाही हातभार लावू शकतो. महिलांच्या बचत गटांना स्थानिक खाद्यपदार्थ किंवा प्रसादाच्या उपक्रमात सहभागी करून घेता येईल. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ देणे म्हणजे आपल्या संस्कृतीला पुढे नेणे होय. अशा स्थानिक सहभागाची दिशाही प्रस्तावित उपक्रमांमध्ये आहे.

आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे उत्सवातील प्रत्येकाचा सहभाग. एखाद्या मंडळाचा उत्सव केवळ काही कार्यकर्त्यांचा न राहता तो संपूर्ण परिसराचा उत्सव व्हावा. ज्येष्ठांसाठी सांस्कृतिक मैफल, महिलांसाठी पारंपरिक खेळ किंवा कौशल्य प्रदर्शन, मुलांसाठी सर्जनशील उपक्रम, तरुणांसाठी क्रीडा व डिजिटल स्पर्धा आणि सर्वांसाठी सामूहिक आरती, भजन किंवा सांस्कृतिक कार्यक्रम असे विविध उपक्रम उत्सवाला सर्वसमावेशक बनवू शकतात. सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, सुरक्षितता आणि गरजूंसाठी मदत अशा छोट्या उपक्रमांमधून उत्सवाचे सामाजिक रूप अधिक सुंदर करता येईल.

यंदा उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांच्या स्पर्धेतही मोठ्या उत्साहाने सहभागी होऊया. ही स्पर्धा केवळ सजावट किंवा देखाव्याची नसून उत्सव कसा साजरा केला, परंपरा किती जपली, समाजाचा सहभाग किती वाढविला, पर्यावरणाची काळजी किती घेतली आणि उपक्रमांमधून किती सकारात्मक संदेश दिला, याचेही एक सुंदर व्यासपीठ बनू शकते.

आजच्या डिजिटल युगात आपल्या गावचा गणपती जगभर पोहोचविण्याची संधीही प्रत्येकाच्या हातात आहे. यासाठी रील्स, छायाचित्रण आणि डिजिटल उपक्रमांना प्रोत्साहन देण्याची कल्पनाही पुढे आली आहे. मात्र डिजिटल उत्साहात प्रत्यक्ष उत्सवाचा आत्मा हरवता कामा नये. मोबाईलच्या कॅमेऱ्याआडून बाप्पाकडे पाहण्यापेक्षा काही क्षण मोबाईल बाजूला ठेवून आरतीत सहभागी होणे, आजी-आजोबांशी गप्पा मारणे, मुलांसोबत प्रसाद वाटणे आणि शेजाऱ्यांच्या घरी जाऊन गणपतीचे दर्शन घेणे—या छोट्या गोष्टीच तर या उत्सवाला खरेपण देतात.

सिंधुदुर्गचा गणेशोत्सव मुळातच माणसांचा उत्सव आहे. लाल मातीच्या अंगणातला बाप्पा शहरातल्या उंच इमारतीत राहणाऱ्यालाही आपलासा वाटतो आणि समुद्रकिनाऱ्यालगतच्या छोट्याशा घरात राहणाऱ्यालाही. इथे बाप्पासोबत येते ती माणसांची ऊब. गावात उत्सवाला आलेला कोकणवासी, घरातली लगबग, शेजारच्या काकूंचा प्रसाद, मित्रमंडळींच्या भेटी, रात्रीची भजनाची मैफल, मुलांचे खेळ आणि विसर्जनाच्या वेळी डोळ्यांत दाटणारी भावना—या सगळ्यांनी गणेशोत्सवाची एक स्वतंत्र कोकणी ओळख निर्माण केली आहे.

ही ओळख जपायची आहे. मात्र जतन म्हणजे परंपरेला जशीच्या तशी बंदिस्त ठेवणे नव्हे. परंपरेचा आत्मा कायम ठेवत तिच्यात काळानुरूप चांगल्या गोष्टींची भर घालणे, हीच खरी सांस्कृतिक समृद्धी आहे. म्हणून यंदा बाप्पाचे स्वागत पारंपरिक पद्धतीने करूया. स्थानिक कला जपूया. आपल्या गावच्या कलाकारांना संधी देऊया. मुलांना आपल्या संस्कृतीशी जोडूया. ज्येष्ठांच्या आठवणी जतन करूया. पर्यावरणाची काळजी घेऊया. पाण्याचे आणि विजेचे महत्त्व समजून घेऊया. प्लास्टिकला नकार देऊया. निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन करूया. स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देऊया. उत्कृष्ट गणेशोत्सवाच्या स्पर्धेत सहभागी होऊया. आणि आपल्या उत्सवातून असा संदेश देऊया की आनंदासाठी निसर्गाला किंमत मोजावी लागत नाही. गणेशोत्सवाच्या काळात विविध श्रद्धा, परंपरा आणि सामाजिक भावना आपल्या आसपास नांदत असतात. त्यामुळे आपल्या आनंदासोबत इतरांच्या श्रद्धांचा आणि भावनांचा आदर राखणे हीदेखील उत्सवाचीच संस्कृती आहे. संयम, परस्पर सन्मान, आपुलकी आणि सलोखा यामुळे उत्सवाचा आनंद अधिक खुलतो. कोणाच्याही भावना दुखावणार नाहीत, याची जाणीव ठेवून आनंद साजरा केला तर आपल्या उत्सवाची उंची आणखी वाढेल.

बाप्पा आपल्याला बुद्धी, विवेक आणि सद्भावनेचा आशीर्वाद देतो, असे आपण मानतो. मग यंदाचा उत्सवही त्याच मूल्यांना साजेसा का नसावा?

आनंद असू दे, पण त्याला
संवेदनशीलतेची साथ असू दे.
उत्साह असू दे, पण त्याला शिस्तीची जोड असू दे.
परंपरा असू दे, पण त्यासोबत नव्या
पिढीची सर्जनशीलता असू दे.
सजावट असू दे, पण निसर्गाची किंमत मोजून नव्हे.
रोषणाई असू दे, पण ऊर्जेची उधळपट्टी नको.
उत्सव असू दे, पण त्यात प्रत्येकाचा सहभाग असू दे.
सिंधुदुर्गच्या लाल मातीतील हीच आपली
गणेशोत्सवाची खरी ओळख—भक्ती,
परंपरा, कुटुंब, गाव, कला, निसर्ग आणि
माणुसकी यांना एकत्र आणणारा उत्सव.
यंदा बाप्पाचे स्वागत अशाच समृद्ध भावनेने करूया.
गणपती बाप्पा मोरया!

लेखक- सचिन अडसूळ,
(जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग)
-९०४९९८७२९८/७०२०२८९३७०

# नागरिकांच्या गरजा लक्षात घेवून तातडीने उपाययोजना कराव्यात : मंत्री दादाजी भुसे

■ मालेगाव (दै. संध्या)

नागरिकांना पाणी, आरोग्य व इतर मूलभूत सुविधा वेळेत उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. नागरिकांनी आपल्या कार्यालयात येऊन समस्या मांडण्याची वाट न पाहता संबंधित अधिकाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेत त्यांच्या गरजा लक्षात घेवून तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले.

शासकीय विश्रामगृह मालेगाव येथे आयोजित सर्व शासकीय विभागांच्या आढावा बैठकीत मंत्री श्री.भुसे बोलत होते. यावेळी महानगरपालिका आयुक्त रवींद्र जाधव, उपविभागीय अधिकारी नितिन सदगीर, तहसीलदार विशाल सोनवणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता आर.एस माळी, महावितरण मालेगाव चे कार्यकारी अभियंता आर.व्ही शिरसाट, जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता आर.एस.जगताप, गटविकास अधिकारी सुनील धस, वनपरिक्षेत्र अधिकारी गायत्री सोनवणे, तालुका कृषी अधिकारी भगवान गोर्डे, , गट शिक्षण अधिकारी निलेश पाटील, सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी शेखर तनपुरे, वैद्यकीय अधिकारी डॉ.साहिल पोतदार, डॉ.मोहित कांचण, उपकार्यकारी अभियंता महावितरण विलास पवार, पंतप्रधान ग्राम सडक योजनेचे कनिष्ट अभियंता सुशांत देवेरे, स्वच्छता निरिक्षक मनिष ठाकरे, यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



मंत्री श्री.भुसे म्हणााले की, नागरीकांच्या मुलभूत सोयी- सुविधांकडे प्रामुख्याने लक्ष देवून त्यांची वेळेत पूर्तता होण्यासाठी सर्व विभागांनी समन्वय ठेवून नियोजन करणे आवश्यक आहे. विभाग प्रमुखांनी आवश्यक ठिकाणी भेटी देवून प्रत्यक्ष कामाची स्थिती तपासावी. नागरिकांच्या समस्या समजून घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी आपापल्या स्तरावर नियमित बैठका घेऊन त्यावर तातडीने कार्यवाही करावी. विविध कामांसाठी शासनाकडून निधी व प्रशासकीय मान्यता उपलब्ध झाल्यानंतर संबंधित प्रक्रिया वेळेत पूर्ण करून कामे मार्गी लावावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. पुढील आढावा बैठक पंधरा दिवसांनी घेण्यात येणार असून, त्यापूर्वी प्रत्येक विभागाने आपापल्या कामाचा प्रगती अहवाल तयार करावा. यासोबत विभागनिहाय कामाची अद्ययावत माहिती तयार ठेवावी. विभागनिहाय कामकाजाचा स्वतंत्र आढावा घेण्याबरोबरच सर्व विभागांच्या कामांची एकत्रित प्रगतीही तपासली जाईल. प्रत्येक विभागाने किमान ५० टक्के कामाच्या प्रगतीची माहिती तीन ते चार प्रतींमध्ये प्रांत कार्यालयात सादर करावी. प्रांत कार्यालयाने सर्व विभागांचे अहवाल एकत्रित करून पुढील बैठकीपूर्वी त्याचे संकलन करावे, असे निर्देश मंत्री श्री. भुसे यांनी दिले.तत्पूवी शालेय शिक्षण मंत्री श्री.भुसे यांनी शासकीय विश्रामगृह मालेगाव येथे तालुक्यातील ग्रामीण भागातील वीजपुरवठा, रोहित्रे, विद्युत उपकेंद्रे आणि वीज वितरणाशी संबंधित विविध समस्यांचा आढावा घेत बैठकीत मांडण्यात आलेल्या समस्यांपैकी किमान ५० टक्के प्रश्न पुढील दोन दिवसांत मार्गी लावावेत, तसेच प्रलंबित रोहित्रे तातडीने उपलब्ध करून वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. बैठकीत ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याची स्थिती, रोहित्रांची उपलब्धता, नवीन उपकेंद्रांची कामे, सौरऊर्जेच्या माध्यमातून होणारा वीजपुरवठा तसेच कृषी पंपांसाठी उपलब्ध वीज याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

# 'रोजगार महाकुंभ'चे २९ सप्टेंबर रोजी आयोजन

■ रत्नागिरी (दै. संध्या)

राज्यातील युवक-युवतींना त्यांच्या शैक्षणिक पात्रता, कौशल्ये आणि क्षमतेनुसार रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी येत्या २९ सप्टेंबर २०२६ रोजी राज्यभरात 'रोजगार महाकुंभ' आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी उमेदवारांनी उपलब्ध करून दिलेला QR Code स्कॅन करून तात्काळ नोंदणी करावी, असे आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले आहे.

रोजगारदात्यांचा व्यापक सहभाग

या रोजगार महाकुंभासाठी उद्योग, नामांकित कंपन्या, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME), मोठी आस्थापने तसेच सेवा क्षेत्रातील रोजगारदात्यांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करण्यात आला आहे. रिक्त पदांची संख्या, पदनिहाय पात्रता आणि आवश्यक कौशल्यांची निश्चिती करून जास्तीत जास्त कंपन्यांना या मेळाव्यात सहभागी करून घेण्याचे नियोजन आहे.

विशेष घटकांच्या सहभागावर भर

आयटीआय (ITI), कौशल्य प्रशिक्षण केंद्रे, महाविद्यालये, विद्यापीठे तसेच जिल्हा रोजगार कार्यालयांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती केली जात आहे. यामध्ये महिला, दिव्यांग, ग्रामीण युवक आणि अल्प उत्पन्न गटातील उमेदवारांचा सहभाग वाढवण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

'जॉब रेडीनेस' पूर्वतयारी प्रशिक्षण

मेळाव्यापूर्वी उमेदवारांना मुलाखतीसाठी सक्षम करण्यासाठी विशेष प्रशिक्षण देण्यात येईल.

महाराष्ट्र शासन

* व्यक्तिमत्त्व विकास (Personality Development)
* संभाषण कौशल्य (Soft Skills)
* रेझ्युमे लेखन (Resume Writing)
* मुलाखत कौशल्य (Interview Skills)
* उद्योगांच्या गरजेनुसार अल्पकालीन कौशल्य प्रशिक्षण व ओरिएंटेशन

पारदर्शक व सुटसुटीत व्यवस्था

मेळाव्याच्या ठिकाणी नोंदणी, समुपदेशन, कागदपत्र पडताळणी, प्रत्यक्ष मुलाखती, निवड प्रक्रिया आणि ऑफर लेटर वितरणासाठी स्वतंत्र कक्ष उभारले जाणार आहेत. निवड झालेल्या उमेदवारांना ऑफर लेटर दिल्यानंतर त्यांच्या प्रत्यक्ष जॉइनिंगबाबत नियमित पाठपुरावा (Follow-up) ठेवण्याची स्वतंत्र यंत्रणा कार्यरत राहणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### धनकवडीतील कचऱ्याचा प्रश्न अखेर मार्गी; रहदारीला अडथळा ठरणारे खांबही हटविले

**कवठे येमाई : दैनिक संध्या**

पुण्याच्या धनकवडी परिसरातील क्राऊन बेकरी ते एकता महिला मंडळ दरम्यान मागील एक ते दीड महिन्यापासून सुरू असलेला कचऱ्याचा प्रश्न तसेच रहदारीला अडथळा ठरणाऱ्या विविध ठिकाणच्या खांबांचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. नागरिकांच्या समस्यांकडे लक्ष वेधत युवा क्रांती पोलीस मित्र संघटनेच्या राष्ट्रीय महिला सहसंपर्कप्रमुख श्रीमती वर्षाताई नाईक यांनी वृत्तपत्रे आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून सातत्याने आवाज उठवून प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या पाठपुराव्याची दखल घेत संबंधित यंत्रणेने अखेर योग्य ती कार्यवाही केली आहे. धनकवडीतील पुण्याई नगर परिसरातील मुख्य रस्त्याच्या एका बाजूला मागील दीड महिन्यापासून मोठ्या प्रमाणात कचरा साचला होता. त्यामुळे परिसरात दुर्गंधी व अस्वच्छतेचे वातावरण निर्माण होऊन नागरिकांना आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत होते. त्याचबरोबर विविध ठिकाणी रस्त्यावर असलेले खांब रहदारीला अडथळा ठरत असल्याने वाहनचालक तसेच पादचाऱ्यांची मोठी गैरसोय होत होती. या समस्यांची दखल घेत संबंधित महापालिका यंत्रणेने कचरा हटविण्यासह रहदारीला अडथळा ठरणारे खांबही काढून टाकले आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.या कामासाठी महापालिकेचे संबंधित विभागाचे आरोग्य निरीक्षक श्रीधर कांबळे, मुकादम अनंता तावरे, जयश्री गायकवाड तसेच संबंधित कर्मचारी यांनी केलेल्या कार्यवाहीबद्दल श्रीमती वर्षाताई नाईक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या वरिष्ठ समाजसेविका श्रीमती वर्षाताई नाईक यांच्या प्रयत्नांचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. प्रशासनानेही नागरिकांच्या तक्रारींची यापुढे तातडीने दखल घेऊन परिसरातील समस्या तत्काळ सोडवाव्यात, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### नाभिक महामंडळाच्या शिरूर तालुका सहसचिवपदी नियुक्ती

**कवठे येमाई : दैनिक संध्या**



महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या शिरूर तालुका सहसचिवपदी शिरूर तालुक्यातील कवठे येमाईचे युवा सामाजिक कार्यकर्ते श्री.अनिल विठ्ठल रायकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या पुणे जिल्हा शिरूर तालुक्यातील कार्यकारिणीत त्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे नियुक्तीपत्राद्वारे जाहीर करण्यात आले आहे. महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष मा. श्री. कल्याणराव ढोले, कार्याध्यक्ष मा. श्री. दामोदर बिडवे, सरचिटणीस श्री. पांडुरंग भवर तसेच जिल्हाध्यक्ष श्री. अशोक मगर,पुणे जिल्हा विभागीय अध्यक्ष रमेश राऊत, भाऊसाहेब पंडित, गणपतराव क्षीरसागर, शिरूर तालुका अध्यक्ष, रामदास जाधव,दत्तात्रय शिंदे यांच्या आदेशाने ही नियुक्ती करण्यात आली आहे. समाजातील बांधवांना संघटित करून समाजाच्या विविध प्रश्नांसाठी कार्य करणे,तसेच महामंडळाच्या नियम व नियमावलीनुसार संघटनेचे कार्य प्रभावीपणे पुढे नेण्याची जबाबदारी रायकर यांच्यावर सोपवण्यात आली आहे.या नियुक्तीबद्दल अनिल विठ्ठल रायकर यांचे समस्त ग्रामस्थ कवठे येमाई व विविध स्तरातून अभिनंदन होत असून, त्यांच्या माध्यमातून शिरूर तालुक्यात नाभिक समाजाच्या संघटनात्मक कार्याला अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.



### आळंदी विकास आराखड्यातील १२ मीटर रस्ता तातडीने विकसित करा

**आळंदी : दैनिक संध्या**

आळंदी विकास योजना (दुसरी सुधारित) मधील ईपी-३९ नुसार मंजूर असलेला १२ मीटर रुंदीचा डी.पी. रस्ता नागरिकांच्या व विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तातडीने विकसित करावा, अशी मागणी नगरसेवक दिनेश रामदास घुले यांनी आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे व मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, आळंदी विकास योजनेमध्ये देहू-मोशी रस्त्यापासून नगरपरिषद शाळा क्रमांक ३ कडे जाणारा सुमारे ८ मीटर रस्ता ईपी-३९ नुसार प्रस्तावित आहे. तसेच विकास आराखड्यात ईपी-३९ नुसार १२ मीटर रुंदीचा रस्ता प्रस्तावित असून, सध्या मोशी-आळंदी रस्त्यापासून शाळा क्रमांक ३ पर्यंत कॉंक्रीट रस्ता उपलब्ध आहे. मात्र, पुणे-आळंदी रस्त्यावरून शाळा क्रमांक ३ कडे जाणाऱ्या रस्त्याला जोडणारा १२ मीटर रुंदीचा डी.पी. रस्ता अद्याप विकसित करण्यात आलेला नाही. हा रस्ता विकसित झाल्यास पुणे-आळंदी रस्त्यावरून मोशीच्या दिशेने जाणारी वाहतूक १२ मीटर रुंदीच्या रस्त्यावरून वळविता येईल. त्यामुळे देहूफाटा चौकातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. तसेच शाळा क्रमांक ३ कडे ये-जा करणारे विद्यार्थी आणि नागरिक यांनाही वाहतूक कोंडीतून मोठा दिलासा मिळणार आहे. त्यामुळे विकास आराखड्यात मंजूर असलेल्या १२ मीटर रुंदीच्या डी.पी. रस्त्याबाबत आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करून रस्ता तातडीने विकसित करावा, अशी मागणी नगरसेवक दिनेश घुले यांनी केली आहे.

# बीएमसीसी आणि 'दगडूशेठ' गणपती ट्रस्टमध्ये सामंजस्य करार

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा अंतर्गत भारतीय ज्ञान परंपरेला अनुसरून अभ्यासक्रमाची निर्मिती

■ पुणे (दै. संध्या)



बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स (बीएमसीसी) आणि श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने अथर्वशीर्ष पठण अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असून, यासाठी बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स येथे सामंजस्य करार करण्यात आला. हा करार तीन वर्षांसाठी असून, या माध्यमातून आध्यात्मिक, सामाजिक आणि साहित्यिक ज्ञानाचा डिजिटल माध्यमातून प्रसार करण्याबरोबरच गाणपत्य तत्त्वज्ञानाचा अभ्यासपूर्ण पद्धतीने प्रसार करण्यावर भर देण्यात येणार आहे.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. दीपक पौडेल, उपप्राचार्य प्रा. डॉ. भारती उपाध्ये, प्रा. डॉ. प्रशांत साठे, प्रा. डॉ. वर्षा देशपांडे, प्रा. डॉ. राजेश्री गोखले तसेच श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे कोषाध्यक्ष शमहेश सूर्यवंशी, विश्वस्त व उत्सवप्रमुख अमोल केदारी आणि ओंकार कलढोणकर उपस्थित होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा अंतर्गत भारतीय ज्ञान परंपरेला अनुसरून ह्या अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आलेली आहे. या उपक्रमांतर्गत विविध अल्पकालीन तसेच ऑनलाइन प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची निर्मिती व अंमलबजावणी करण्यात येणार आहे. बीएमसीसी हे या उपक्रमासाठी शैक्षणिक व्यासपीठ म्हणून काम करणार असून, ऑनलाइन प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे प्रमाणीकरण व मानकीकरण करण्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहणार आहे. तर श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या माध्यमातून समाजमाध्यमांसह विविध माध्यमांचा वापर करून आध्यात्मिक विचारांमध्ये रुची असलेल्या व्यक्तींना अभ्यासक्रमांशी जोडण्यात येणार आहे. अथर्वशीर्ष पठणाचा अभ्यासक्रम बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स येथे राबविण्यात येणार असून, अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या वतीने प्रमाणपत्र, तर महाविद्यालयाच्या वतीने श्रेयांक देण्यात येणार आहेत. या माध्यमातून अथर्वशीर्ष पठणासोबतच त्यामागील आध्यात्मिक व सांस्कृतिक विचारांचा अभ्यास विद्यार्थ्यांना करता येणार आहे. या उपक्रमासाठी बीएमसीसीकडून लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी संस्कृत विभाग प्रमुख डॉ. स्वानंद गजानन पुंड आणि ट्रस्टकडून अध्यक्ष सुनील रासने हे समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत.

## ओतूर महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

■ नारायणगाव(दै. संध्या)

ओतूर येथील अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयात जिमखाना विभागाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भारताचे महान हॉकीपटू व 'हॉकीचे जादूगार' म्हणून प्रसिद्ध असलेल्या मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस विविध क्रीडा उपक्रमांनी साजरा करण्यात आला.या निमित्ताने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी धावणे, बॅडमिंटन, बुद्धिबळ यांसह विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

प्रास्ताविक डॉ. विनायक कुंडलिक यांनी केले, ज्यामध्ये त्यांनी या स्पर्धांमागील भूमिका आणि महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या क्रीडाकौशल्याचे प्रदर्शन केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण होण्याबरोबरच शारीरिक तंदुरुस्ती,



शिस्त आणि संघभावनेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. धावण्याच्या स्पर्धांमध्ये १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर आणि ८०० मीटर तसेच १५०० मीटर अंतराच्या स्पर्धा घेण्यात आल्या.या स्पर्धांमध्ये कुणाल कुटे,चिराग हांडे, राजेश्वरी धुरी,यश पानसरे, शंकर बारे, सागर ससाणे, प्रसाद औटी व ओमकार धराडे या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत यश संपादन केले. यासोबतच आयोजित करण्यात आलेल्या बॅडमिंटन आणि बुद्धिबळ स्पर्धांनाही विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. बॅडमिंटन स्पर्धेत यश पानसरे आणि श्रावणी घोलप यांनी प्रथम क्रमांक पटकावून आपले वर्चस्व सिद्ध केले.

## 'समर्थ'च्या चिमुकल्यांचा रक्षाबंधन उपक्रम

■ नारायणगाव(दै. संध्या)

रक्षाबंधनाच्या पवित्र सणाचे औचित्य साधून जुन्नर तालुक्यातील बेल्हा येथील 'समर्थ गुरुकुल' या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत एक अनोखा आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आला. शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी निसर्गाचा खरा रक्षक असलेल्या वृक्षांना राखी बांधून पर्यावरण संवर्धनाचा एक अतिशय सुंदर संदेश समाजाला दिला आहे.



निसर्ग हाच मानवाचा खरा पाठीराखा आणि रक्षणकर्ता आहे, या भावनेतून या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने भाग घेतला. या उपक्रमांतर्गत शाळेत 'पर्यावरणपूरक राखी निर्मिती कार्यशाळा' आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेला वाव देत रंगीबेरंगी कागद, फुले आणि विविध कलात्मक साहित्याचा वापर करून अत्यंत आकर्षक व सुंदर हस्तनिर्मित राख्या तयार केल्या. या राख्यांमधून विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांचा आणि कलाकौशल्याचा उत्कृष्ट आविष्कार पाहायला मिळाला.स्वतः तयार केलेल्या या राख्या विद्यार्थ्यांनी परिसरातील विविध वृक्षांना बांधल्या. वृक्ष आपल्याला सावली, फळे, फुले आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्राणवायू देऊन जीवसृष्टीच्या संरक्षणात मोलाची भूमिका बजावतात. त्यामुळे वृक्षांचे रक्षण करणे ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे, अशी भावना विद्यार्थ्यांनी यावेळी व्यक्त केली.सर्व विद्यार्थ्यांनी मिळून पर्यावरण संवर्धनाची आणि निसर्ग रक्षणाची शपथ घेतली.या स्तुत्य उपक्रमासाठी कलाशिक्षिका दीप्ती चव्हाण यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या अनोख्या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहल शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, सचिव विवेक शेळके, प्राचार्य सतीश कुऱ्हे,प्रदीप गाडेकर, प्राचार्य राजीव सावंत, क्रीडा संचालक एच.पी नरसुडे आदींनी कौतुक करून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## स्व.डॉ.गिरीश ढमाले स्मृती मॅरेथॉन संपन्न

■ नारायणगाव : (दै. संध्या)

लायन्स क्लब ऑफ नारायणगाव पुरस्कृत आणि डॉ. गिरीश ढमाले स्पोर्ट्स फाउंडेशन आयोजित पहिल्या स्व.डॉ. गिरीश ढमाले स्मृती मॅरेथॉन २०२६ मोठ्या उत्साहात नारायणगाव येथे संपन्न झाली. स्व.गिरीश ढमाले यांच्या प्रतिमेचे पूजन करून राष्ट्रगीताने स्पर्धेची सुरुवात करण्यात आली.



यात स्पर्धेत एकूण ५ गटात लहान मुले, मुलींपासुन ज्येष्ठ नागरिकांपर्यंत एकूण ५२७ खेळाडूंनी सहभाग घेतला. पुणे, नाशिक, सांगली, बारामती, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील खेळाडूंनी सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. यात एकूण सहा गटात प्रत्येक गटात १० क्रमांक काढून प्रमाणपत्र, सन्मान चिन्ह, रोख रक्कम व मेडल देऊन गौरविण्यात आले. तसेच उपस्थित प्रेक्षकांना लकी ड्रॉच्या माध्यमातून आकर्षक बक्षीसे देण्यात आली.

यानिमित्ताने आरती गिरीश ढमाले, शिवसेना तालुकाप्रमुख व उपसरपंच योगेश उर्फ बाबु पाटे, उद्योजक अशोक गांधी, युवा नेते सुरज वाजगे, भागेश्वर डेरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे, पोलीस उपनिरीक्षक जगदीश पाटील, पोलीस उपनिरीक्षक स्वाती काठे/धोंगडे, गोपनीय विभागाचे दत्ता ढेंबरे, शिरीष ढमाले, लायन्स क्लब नारायणगावचे प्रोजेक्ट इन्चार्ज मनोज भळगट, राजेंद्र देसाई, अध्यक्ष वैभव मुथ्था, सचिव गिरीश मुनोत, खजिनदार हिमांशू शहा, योगेश रायकर, ला. आनंद कोठारी, डॉ.अनुष्का शिंदे, प्रा.लहू गायकवाड, प्रा.श्रीकांत फुलसुंदर, प्रा.शरद काफले यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.


यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्पर्धेसाठी असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक करत खेळाडूंना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी डॉ. गिरीश ढमाले स्पोर्ट्स फाउंडेशनचे अध्यक्ष परशुराम वारुळे, उपाध्यक्ष सचिन जुंदरे, सचिव अशफाक पटेल, सहसचिव रवी शिंदे, खजिनदार सुशांत बनकर, सहखजिनदार दादासाहेब कोठाळे, संचालक प्रशांत इचके, राजु कोऱ्हाळे, प्रा. दिलीप शिवणे यासह विक्रांत खरगे, जुबेर शेख, क्रीडा शिक्षक प्रा.उमेश पनेरू, डॉ.सुनील पानसरे सर, बबन गुळवे, एच.पी नरसुडे, भालेराव सर, सचिन काशिद, अमित झरेकर, ओंकार मेहेर, यांसह कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय नारायणगावचे प्राध्यापक, छात्रसेना विद्यार्थी, नारायणगाव पोलीस स्टेशन, क्रीडा शिक्षकांनी मोलाचे सहकार्य केले.

## पाच फुटाच्या बच्चन'मध्ये तगड्या कलाकारांची फौज

■ पुणे (दै. संध्या)

आपल्या अनोख्या नावाने चर्चेत असलेल्या, एका कीर्तनकार तरुणीची गोष्ट सांगणाऱ्या 'पाच फुटाचा बच्चन' या चित्रपटाचा टीजर नुकताच सोशल मीडियावर लॉंच करण्यात आला आहे. उत्तम कलाकारांचा समावेश असलेला हा चित्रपट येत्या ९ ऑक्टोबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.



'पाच फुटाचा बच्चन' या चित्रपटात तरूण कीर्तनकार मुलीची गोष्ट आहे. तिच्या कीर्तनात कोल्हापुरी भाषा आहे. संतांचे अभंग तिला मुखोद्गत आहेत. जनमानसात तिचं प्रचंड नाव आहे. उंचीने पाच फूट असलेल्या या तडफदार मुलीला 'पाच फुटाचा बच्चन' म्हणून ओळखलं जातं. या प्रमुख भूमिकेतून श्रुती मधुदीप ही अभिनेत्री पदार्पण करत आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाच्या टिजरने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. यात तगड्या कलाकारांची फौज आहे. त्यांचे नवे लुक बघून, पात्रांची झलक बघून उत्सुकता तयार होते आहे. मराठी मनाला भावणाऱ्या कीर्तन या विषयाला हा सिनेमा साद घालतो आहे, असं दिसतं आहे. अवघ्या दीड मिनिटाचा हा टीजर अत्यंत नाट्यमय असून त्यातील दृश्यांनी प्रेक्षकांची मने खिळवून ठेवली आहेत.

# प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा वाढदिवस साजरा

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. हर्षवर्धन सपकाळ साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या वतीने कॉंग्रेस भवन येथे वाढदिवस साजरा करण्यात आला.

या प्रसंगी कॉंग्रेस भवन येथे वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला व त्यानंतर केक कापून लहान मुलांना त्याचे वाटप करण्यात आले. तसेच निवारा वृध्दाश्रम येथे अन्नदान करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन वृक्ष प्राधिकरण समितीचे माजी सदस्य व पुणे शहर कॉंग्रेस ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष द. स. पोळेकर व पुणे शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटी पश्चिम विभागाचे खजिनदार चंद्रशेखर कपोते यांनी केले. यावेळी शहर चिटणीस राजाभाऊ कदम, सेवादलाचे अध्यक्ष लतेंद्र भिंगारे, सुभाष जेधे, धिरज खोरे, फैय्याज शेख, सुरेश नांगरे, किर्ती भोसले, राहुल वंजारी, नरेश अवटे, पोपट पाटोळे, ज्ञानेश्वर निम्हण, नाना भेगडे, सुष्मिता हरणे, भास्कर कांबळे, वैशाली कुलकर्णी आदी उपस्थित होते.

